# आधुनिक केसरी

शुक्रवार, 24 जून 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 01 अंक - 291
Title Code : MAHMAR51117

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●FRIDAY 24 JUNE 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-01 ●ISSUE-291 ●TITLE CODE : MAHMAR51117 ●PAGE-10 ●PRICE-5


# आघाडीतून बाहेर पडायला तयार

## बंडखोरांनी पुढच्या २४ तासांत मुंबईत यावे : संजय राऊत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : तुमचं म्हणणं आहे ना, आघाडीतून बाहेर पडा, नक्की विचार करु, पुढच्या २४ तासांत बंडखोर आमदारांनी मुंबईत यावे. तुमची अधिकृत भूमिका शिवसेना पक्षप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे यांच्याकडे मांडावी. तुमच्या मागणीचा नक्की विचार केला जाईल, असे मोठे वक्तव्य खासदार संजय राऊत यांनी केले आहे. मोबाईलवरुन, व्हॉट्सअॅपवरुन तुमच्या मागण्या मांडण्यापेक्षा समोर येऊन तुमच्या ज्या काही मागण्या असतील त्या मांडा, तुमच्या मागण्यांचा उद्धव ठाकरे नक्की विचार करतील, फक्त पुढच्या २४ तासांत मुंबईत या, असा मेसेज संजय राऊत यांनी बंडखोर आमदारांना दिला आहे.**

एकनाथ शिंदे यांच्या गटातून निसटलेले कैलास पाटील आणि नितीन देशमुख यांनी पत्रकार परिषद घेतली. याच पत्रकार परिषदेत आमदार पाटील आणि आमदार देशमुखांनी सुटकेचा थरार सांगितल्यावर संजय राऊत यांनी पुढच्या दोन मिनिटांत राज्याचं राजकारण बदलणारं २ मोठी वक्तव्ये केली.

जे आमदार या क्षणी महाराष्ट्राच्याबाहेर आहेत, या सर्व आमदारांची इच्छा असेल तर महाविकासआघाडीतून शिवसेनेने बाहेर पडले पाहिजे आणि वेगळा विचार केला पाहिजे, त्यांच्या मागणीचा विचार केला जाईल. पण त्यांनी मुंबईत येऊन ही मागणी मांडावी. महाविकास आघाडीतून शिवसेना बाहेर पडायला तयार आहे. तुम्ही २४ तासांत परत या. तुमच्या मागणीचा उद्धव ठाकरे विचार करतील. हे मी जबाबदारीने सांगत आहे, असे संजय राऊत यांनी म्हटले.

संजय राऊत यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ माजण्याची शक्यता आहे. कारण संजय राऊत यांचे हे वक्तव्य म्हणजे शिवसेना ही राष्ट्रवादी आणि काँग्रेसची साथ सोडून महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा विचार करत असल्याचे संकेत मिळत आहेत. एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आम्ही शेवटपर्यंत शिवसेना आणि उद्धव ठाकरे यांच्या पाठिशी उभे राहू, अशी भाषा केली जात आहे. मात्र, त्याचवेळी आता शिवसेना मात्र महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याची तयारी दर्शवित असल्याने महाराष्ट्राच्या राजकारणातील समीकरणे पूर्णपणे बदलण्याची शक्यता आहे.

### मतदारसंघाकडे निघालेले आमदार संतोष बांगर पुन्हा मुंबईला परतले

बंडखोरीनंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वर्षा हे निवासस्थान सोडल्यानंतर मुंबईतील आमदारांना आपापल्या मतदारसंघात जाण्याचे आदेश दिले. या आदेशानंतर मतदार संघात परतण्यासाठी निघालेले शिवसेनेचे आमदार संतोष बांगर यांना पुन्हा एकदा तातडीने मुंबईत दाखल होण्याचे आदेश मातोश्रीवरून देण्यात आले आहेत. त्यामुळे हिंगोलीच्या कळमदूरी मतदारसंघात परतणारे शिवसेना आमदार संतोष बांगर हे नाशिक वरून पुन्हा एकदा मुंबईकडे रवाना झाले आहेत. उद्धव ठाकरे यांच्याशी एकनिष्ठा राखणाऱ्या आमदारांपैकी संतोष बांगर हे एक आमदार आहेत, बांगर हे गेल्या काही दिवसांपासून मुंबईच्या हॉटेलमध्ये वास्तव्यास होते, त्यानंतर आज ते हिंगोलीत येण्यासाठी मुंबई वरून निघाले होते मात्र मातोश्रीच्या आदेशानंतर त्यांना पुन्हा एकदा मुंबईकडे परतावे लागले आहे. बांगर हे गेल्या काही दिवसापासून मुंबईमध्ये असल्यामुळे कार्यकर्ते देखील त्यांच्या संपर्कापासून तुटले होते. हिंगोली जिल्ह्यांमध्ये संतोष बांगर यांची सध्या वेगळी ख्याती निर्माण झालेली आहे. ते उद्धव ठाकरे यांचे अगदी निकटवर्तीय मानले जातात.

### बहुमत सिद्ध करु ते मविआतून सोडण्याची तयारी

शिवसेना खासदार संजय राऊत यांनी उस्मानाबादमधील आमदार कैलास पाटील आणि नितीन देशमुख यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेतली. संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत दोन वेगळ्या भूमिका मांडल्या. सुरुवातीला संजय राऊत यांनी हा संघर्ष पोहोचल्यास महाविकास आघाडी सरकार विश्वास दर्शक ठरावात विजयी होईल, असे म्हटले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे वर्षावर पुन्हा परतील हा विश्वास संजय राऊत यांनी व्यक्त केला. कैलास पाटील आणि नितीन देशमुख बोलल्यानंतर संजय राऊत यांनी गुवाहाटीमधील आमदारांना एक आवाहन केले. मुंबईत येऊन उद्धव ठाकरेंसमोर प्रस्ताव मांडा, शिवसेना महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडण्याचा विचार करु, असे संजय राऊत यांनी म्हटले.

## चर्चेतली बातमी

### आसाममधील आमदारांना बंगालला पाठवा : ममता बॅनर्जी



आधुनिक केसरी न्यूज

**कोलकाता :** आसाममधील हॉटेलमध्ये ठेवण्यात आलेल्या शिवसेनेच्या आमदारांना पश्चिम बंगालला पाठवा, त्यांचा योग्य पाहुणचार करु असा टोला पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपला लगावला आहे. सत्तेचा गैरवापर करुन भाजपने महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे सरकार पाडण्याचे प्रयत्न सुरू केले असल्याचा आरोपही त्यांनी केला. महाराष्ट्रातील उद्‌भवलेल्या राजकीय परिस्थितीवर त्यांनी पत्रकार परिषदेमध्ये भाष्य केले. ममता बॅनर्जी म्हणाल्या की, असैंविधानिक मार्गाने भाजपकडून महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे सरकार पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज भाजप सत्तेत आहे, त्यांच्याकडे अधिकार आणि पैसा आहे. भाजपकडून पैसा, सत्ता आणि माफियांचा वापर करुन पक्ष फोडण्याचा प्रयत्न केला जातोय. हे जे काही सुरू आहे ते चुकीचं आहे. पण एक दिवस तुम्हालाही सत्तेतून पायउतार व्हावे लागेल. त्यावेळी तुमचाही पक्ष कोणीतरी फोडेल. आसाममधल्या हॉटेलमध्ये असलेल्या शिवसेनेच्या आमदारांना पश्चिम बंगालमध्ये पाठवून द्या, त्यांचा योग्य पाहुणचार करू.

# दक्षिण भारतात मुसळधार पावसाची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशातील अनेक राज्यांना मान्सूनने दणका दिला. आता उत्तर भारताकडे वाटचाल होत असली, तरी दक्षिणेकडील राज्यांमध्ये मुसळधार पाऊस सुरूच आहे. कर्नाटक, केरळ, गोवा आदी राज्यांमध्ये पुढील पाच दिवस मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली.

याशिवाय, बिहार-झारखंडमध्येही पावसाचा इशारा देण्यात आला. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, बिहारमध्ये गेल्या काही दिवसांपासून पाऊस आणि वादळी वाऱ्याचा परिणाम झाला. पुढील काही दिवस मुंबईत पावसाचा जोर कायम राहणार असल्याचे हवामान खात्याने म्हटले. रायगड आणि पुण्यासह महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांसाठी हवामान खात्याने रेड अलर्ट जारी केला. हवामान खात्याने गुरुवारी वेगळ्या ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला. मुंबई करता दोन दिवसांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला. इथेही मुसळधार पावसाची शक्यता आहे.



हवामान खात्याने ट्विट करून येत्या काही दिवसांच्या हवामानाची माहिती दिली. कोकण, गोवा, कर्नाटक आणि केरळ इथे पुढील पाच दिवस मुसळधार पाऊस पडेल, असे हवामान खात्याने म्हटले. मध्य महाराष्ट्रात 24 ते 26 जून, कर्नाटकात 24 ते 25 जून, गुजरातमध्ये 25 आणि 26 जूनला पाऊस पडेल. तर, दुसरीकडे बंगालच्या उपसागरापासून ईशान्य आणि लगतच्या पूर्व भारतापर्यंत दक्षिण, नैऋत्य वाऱ्यांच्या प्रभावामुळे 25 आणि 26 जून रोजी जोरदार पावसाची शक्यता आहे. याशिवाय, 23 आणि 24 तारखेला विदर्भात पाऊस पडेल. दरम्यान, मान्सूनपूर्व पावसामुळे अनेक राज्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून पावसाची रिमझिम सातत्याने सुरू आहे.

# माजी उपमुख्यमंत्र्यांवर अन्नाद्रमुकच्या भरसभेत फेकल्या बाटल्या

आधुनिक केसरी न्यूज

**चेन्नई :** तामिळनाडू येथे अन्नाद्रमुक आज पक्षाची सर्वसामान्य बैठक पार पडली. यावेळी माजी उपमुख्यमंत्री ओ. पनीरसेल्वम यांच्यावर बाटल्या फेकण्यात आल्या. चेन्नईतील वनागरम येथील श्रीवरू वेंकटचलपथी पॅलेसमध्ये ही बैठक सुरु होती. त्यामुळे बैठक अर्ध्यावर सोडून ते बाहेर पडले. या घटनेमुळे काही काळासाठी सभेच्या ठिकाणी तणावाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, या प्रसंगामुळे आता राजकीय वर्तुळातून चर्चांना ऊत आला आहे.

पक्षाच्या महापरिषदेत सदस्यांचे एकल नेतृत्व करण्याच्या मागणीवर ठाम राहून त्यांचे प्रतिस्पर्धी आणि संयुक्त निमंत्रक ई.के. पलानीस्वामी यांची बाजू घेतल्यानंतर ते सभेतून निघून गेले. पलानीस्वामी यांच्या समर्थकांनी त्यांना सजवलेला मुकुट, तलवार आणि राजदंड सादर केल्याने पनीरसेल्वम आणि एआयएडीएमकेचे उपसचिव वैथिलिंगम यांच्यासह त्यांचे समर्थक सभा सोडून गेले आहेत.

या बैठकीत एकहाती नेतृत्वाची मागणी झाली आहे. त्यामुळे पनीरसेल्वम पलानीस्वामी यांच्याजवळ व्यासपीठावर बसले होते. दरम्यान, महापरिषदेची पुढील बैठक 11 जुलै रोजी होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. गुरुवारी येथे झालेल्या अन्नाद्रमुक महापरिषदेच्या बैठकीत सर्व 23 ठराव फेटाळण्यात आले आहेत. आणि परिषदेच्या सदस्यांची एकमेव मागणी संयुक्त निमंत्रक ई.के. पलानीस्वामी यांच्या बाजूने पक्षासाठी एकच नेतृत्व प्रणाली सादर करणे.

उपसचिव के. पी. मुनुसामी म्हणाले की, एकल नेतृत्व हीच सदस्यांची मागणी असल्याचे सर्वसाधारण परिषदेच्या सर्व सदस्यांनी सर्व 23 प्रस्तावित ठराव फेटाळले आहेत. जेव्हा एकच नेतृत्वाचा ठराव (पलानीस्वामी यांच्या बाजूने) मांडला जाईल आणि भविष्यातील सर्वसाधारण परिषदेच्या बैठकीत तो मंजूर होईल, तेव्हाच इतर सर्व ठरावांनाही मान्यता दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# डबलढोलकी कैलास पाटीलपासून सावध राहा

## एकनाथ शिंदे गटाचे आ. तानाजी सावंत यांचा खुलासा

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : विधान परिषदेच्या निकालानंतर एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारसमोर मोठे संकट उभं राहिले आहे. त्यात आमदारांचे अपहरण करून त्यांना सूरतला नेण्याचा प्रयत्न केला असा गंभीर आरोप केला. उस्मानाबादचे आमदार कैलास पाटील यांनी माध्यमांसमोर थरारक अनुभव सांगितला. त्यावरून आता गदारोळ माजलेला असताना शिंदे गटाचे आमदार तानाजी सावंत यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे.


आमदार तानाजी सावंत म्हणाले की, गुप्त मतदान झाल्यानंतर कैलास माझ्याकडे आला, तो म्हणाला नंदनवनला जायचं. आम्ही दोघं एकाच गाडीने एकनाथ शिंदे यांच्या घरी गेलो. चर्चा केली. त्यानंतर आम्ही सूरतच्या दिशेने निघालो. वाहनात तो त्याच्या मोबाईलमध्ये व्यस्त होता. गुजरातच्या चेकपोस्टवर आल्यानंतर लघुशंकेसाठी गाडी थांबवली. त्यानंतर मला चर्चा करायची असे बोलला. मी सांगितले आता काय चर्चा करायची तूच सांगितले म्हणून आपण आलो. तेव्हा माघारी जायचे असे बोलला कारण विचारले तर नाही मला भीती वाटतेय असे तो म्हणाला. मग माघारी जायचे असेल तर माझी गाडी घेऊन जा असे मी बोललो.

मात्र आता माध्यमासमोर कैलास पाटील मीडियाची दिशाभूल करतोय. गन पॉईंटवर त्याला नेले, असले काहीही झाले नाही. संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेची आणि पक्षप्रमुखांशी दिशाभूल करतोय. तुमच्यामुळे शिवसेनेत आहे असे वारंवार माझ्याशी बोलायचा. अडीच वर्ष माझी आणि पक्षप्रमुखांची दिशाभूल केली. मीडियासमोर जे सांगितले त्यातले काहीही घडले नाही. भाईंनी कुणालाही फोन केला नाही, कुणावरही दबाव नाही प्रचंड पाऊस पडत असताना ४ किलोमीटर चालत गेले असल्याचा दावा साफ खोटा आहे. आमदार कैलास पाटील खोटे आणि आभासी कथानक रचून मातोश्रीची आमदार सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न करताहेत हे दुर्दैवी आहे. डबलढोलकी असणारे आमदार कैलास पाटील यांच्यापासून पक्षप्रमुख यांनी देखील सावध राहावे असे आमदार तानाजी सावंत यांनी म्हटले आहे.

### ४ किमीचा थरारक पायी प्रवास

विधानपरिषदेचे मतदान संपल्यानंतर डिनरसाठी जायचे सांगून अनेक आमदारांना वेगवेगळ्या वाहनांनी सूरतला नेल्याचा आरोप करण्यात येत आहे. या वाहनातून उस्मानाबादचे आमदार कैलास पाटील हे नाट्यमयरित्या गुजरात बॉर्डरहून निसटले. सोमवारी विधानपरिषदेसाठी मतदान पूर्ण झाल्यानंतर शिवसेनेतीलच काही नेत्यांनी डिनरसाठी ठाण्याला जायचे आहे असे आमदारांना सांगितले. यानंतर सायंकाळी वेगवेगळ्या वाहनांमध्ये बसवून बस ठाण्याच्या दिशेने मार्गस्थ करण्यात आली. मात्र, ठाणे ओलांडून पुढे गेल्यानंतरही वाहने थांबत नव्हती. काही तासाचा प्रवास झाल्यानंतर चलबिचल सुरु झाल्याने पुढे शिंदे साहेब थांबले आहेत, त्यांना भेटू, असे सांगून वाहने तशीच पुढे नेण्यात आली. ही वाहने महाराष्ट्र-गुजरात सीमेवर थांबविण्यात आली होती.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सफर पाटणादेवीची

आधुनिक केसरी

आता आपण चालतोय तेव्हाही दिसतीलच. फक्त सावध राहा आणि आवाज करू नका. धवल तीर्थाकडे जाताना आपल्याला सगळ्या प्रकारची झाडं दिसतील. प्राणी , पक्षी दिसतील. जैव विविधतेनं हे जंगल समृद्ध आहे. अर्जुन, साल, साग, निंब, करंज, उंबर, कवठ इ विविध प्रकारची झाडं आपल्याला आता बघायला मिळताहेत. आणि हवेतला शुद्ध प्राणवायू आणि गारवा मनाला उत्साहित करतो आहे. धवलतीर्थाकडे जाताना मध्येच दोन वेळा आपल्याला नदी ओलांडावी लागेल. नदीतून चालताना पायात बूट असले तर काढून घ्या. थंड पाण्यात पाय बुडू द्या. सगळे श्रम हरण होऊन ताजेतवाने वाटेल. नदीचे पाणी बघा किती स्वच्छ आणि खळाळत वाहणारे आहे. पाण्यातील दगडगोटे स्वच्छ दिसतात. मध्येच आपल्याला एकदोन चढण चढायच्या आहेत. चढताना अगदी छोटी पायवाट आहे. सांभाळून चालावे लागेल. आपल्या या पायवाटेवर बघा सुकलेल्या पानांचा कसा सडा पडला आहे. आणि बाजूच्या झाडांना हिरवीकंच पालवी फुटली आहे. नुकताच पाऊस पडून गेल्याने एक वेगळाच रानफुलांचा आणि पानांचा एक अनामिक गंध हवेत मिसळला आहे. हा गंध आपल्याला अगदी दाट जंगलातच अनुभवायला मिळतो बरं का ! ही ताजी शुद्ध हवा फुफ्फुसात किती भरून घेऊ आणि किती नको असं होऊन जातं . या सुंदर वातावरणातून आपण चालतोय. मन कसं हलकं झालंय . पाय जमिनीवर पण मन आकाशात. ' आजकल पाँव जमीपर नही पडते मेरे...' अशी अवस्था होतेय ना...!

समोर बघितलं का ? उंचच उंच पर्वतशिखरावरून कोसळणारा धबधबा दर्शन देतोय आपल्याला. केवढा हा आवाज त्याचा...! आजूबाजूच्या शांत वातावरणात घुमतोय. शुभ्र धवल धारा उंचावरून कोसळताहेत. जणू शंकराच्या जटेतून कोसळणारी गंगेची धारा. आणि हे सगळं वातावरणच एवढं भव्य दिव्य आहे की मनाचा क्षुद्रपणा या निसर्गाच्या सहवासात कुठल्या कुठे पळून जातो. धवलतीर्थांच्या या धारा आपल्या मनालाही पावन करतात. हे नयनरम्य दृश्य डोळ्यात किती साठवू आणि किती नाही असं होऊन जातं . त्या धबधब्याच्या खाली मोठं तळं साचलंय थंडगार पाण्याचं . पण धबधब्याखाली अंघोळ करण्याचं किंवा या तळ्यात उतरण्याचं साहस मात्र करू नका. ते अत्यंत धोकादायक ठरू शकतं . आजूबाजूला छान उंच आणि स्वच्छ खडक आहेत. आपण आता आपल्याबरोबर आणलेली शिदोरी सोडू या. फिरण्यामुळे आणि पायी चालल्याने भूकही लागलीय. जेवण झाल्यानंतर थोडा वेळ इथेच बसून आराम करू या आणि मग आपल्या परतीच्या प्रवासाला निघूया. काय, चालेल ना..? मग सांगा मला तुमची ट्रीप कशी झाली ?



# आनंदी पहाट

## कलाकृतीतून संस्कृतीचं दर्शन

आधुनिक केसरी

प्रत्येक कलेला आपापलं शास्त्र असल्याचं आपण समजून घ्यायला पाहिजे. गायन ही कला आहे; परंतू त्याची सुरुवातच शास्त्रीय संगीतानं होते. ख्याल, धृपद, धमार, टप्पा, ठुमरी, भजन, गजल असे काही महत्वाचे गायन प्रकार प्रचलित असल्याचं आपल्याला माहित आहेच. नृत्य ही देखील कला आहे; तरीही भरतनाट्यम, कथक, कथकली, कुचिपुडी, मणिपुरी, ओडिसी, मोहिनीअट्टम हे सर्वच शास्त्रीय नृत्य प्रकार आहेत. अलीकडच्या काळांत एकूणच अंधानुकरण आणि पाश्चात्यांच्या सांगीतिक संस्कृतीचा आपल्या नवीन पिढीवर असलेला पगडा ह्यामुळे गायन, नृत्य अशा कलेच्या शास्त्रीय बैठकीचं महत्व लोप पावत चाललं आहे, ही खेदाची बाब आहे. चित्रकलेच्या बाबतीत देखील साकारलेलं चित्र मॉडर्न आर्टच्या नावाखाली विचित्र असल्याची जाणीवच ह्या नवीन पिढीला होत नसल्याचं अधोरेखित करावं असं वाटतं. आपल्या संकृतीचं दर्शन आपल्या कलाकृतीतून प्रत्येकाच्या प्रकृतीनुसार होणं योग्य ठरत असून देखील, त्याची जाणीवच न होणाऱ्या कलेचं सादरीकरण करणाऱ्यांना उणिव संपन्नच म्हणावं लागेल. आपल्या देशाला कलाक्षेत्रात खूप मोठा वारसा लाभलेला असून देखील त्याची जपणूक करणं जरुरीचं का आहे? हेच सर्वप्रथम शालेय जीवनापासून शिकवलं पाहिजे, बालवयातच प्रत्येकाच्या अंतर्मनावर कोरलं गेलं पाहिजे. आपल्या प्रत्येकाला नेहमीच काहीतरी वेगळं करायची इर्षा असते. अर्थात ती असायला देखील काहीच हरकत नाही; परंतू आपण आपल्या देशाच्या ऐतिहासिक कलांचे वारसदार आहोत ह्याचा स्वाभिमान देखील बाळगला पाहिजे. निदान आपण कलांचे वारसदार असल्याची जाणीव तरी व्हायला पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## अनाथांची वारी | धन्य झाली ||

कर्तव्याची जाण | असावी संसारी ||
शोधावी पंढरी | अंतरात ||१||

नसावा आकस | दुजाभाव उरी ||
भजावा अंतरी | पांडुरंग ||२||

जपावे वैराग्य | करूनी संसार ||
नेक व्यवहार | सुखदायी ||३||

सदा संतवृत्ती | ज्याच्या मनी वसे ||
माऊलीच दिसे | त्याचे ठायी||४||

मायबाप झाला | पंढरीचा हरि ||
अनाथांची वारी | धन्य झाली ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "नीतिशतक निरुपण"

आधुनिक केसरी


**क्वचित् पृथ्वीशय्यः क्वचिदपि च पर्यङ्कशयनः**
**क्वचिच्छाकाहारः क्वचिदपि च शाल्योदनरूचिः ।**
**क्वचित् कन्थाधारी क्वचिदपि च दिव्याम्बरधरो**
**मनस्वी कार्यार्थी न गणयति दुःखं न च सुखम् ।।**

**अर्थ :** ज्याला आपला कार्यभाग साधावयाचा आहे, तो मनस्वी माणूस कधी जमीनीवर झोपतो, कधी पलंगावर झोपतो. कधी कन्दमूळ त्याचा आहार असतो, कधी तो उत्कृष्ट भातादि अन्नाचा आस्वाद घेतो. कधी तो साधारण वस्त्र लेवतो, तर कधी उच्च प्रतीचे वस्त्र लेवचतो. तो आपल्या दुःख किवा सुखाची गणना करीत नाही. अर्थात आपदेने किंवा संपदेने तो आपल्या कार्याच्या उद्दिष्टापासून किंचितही विचलित होत नाही. जो मनुष्य स्वाभिमानी आहे, ज्याला आपल्या ध्येयांची आणि उद्दिष्टांची पूर्तता करावयाची आहे, तो सुख् दुःखाची पर्व करीत नाही. तर आपल्या ध्येयाप्रति एकनिष्ठ राहून निरंतर प्रयत्न करीत असतो, असे येथे भर्तृहरींनी प्रतिपादन केले आहे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# ।। दासबोध स्तवन ।।



## ब्रह्मपावन निरूपण

आधुनिक केसरी

मित्रांनो तुम्हाला परमेश्वराच्या सानिध्यात राहुन ब्रम्हविद्या शिकायची आहे तर ब्रम्हांडात शाश्वत काय आहे? अशाश्वत काय आहे। हे प्रथम शिकले पाहिजे. सद्‌गुरू आपल्याला शाश्वत जे ब्रम्ह त्याचें अनुसंधान कसे ठेवायचे या कलेचा अभ्यास आपल्याकडून करून घेतात. साररूप ब्रम्ह सर्व  दृश्य सगळ्या जगाला व्यापून टाकते.आपल्याला जे जे सर्व काही दिसते ते ते ते पंचमहाभूताच्या पासून बनलेले आहे. नाम व रूप सतत बदलत असते. परंतू ब्रम्ह मात्र अचल व अटळ असते. आपला मनुष्यदेह इंद्रिंयांच्या कक्षेत वावरतो. ऊदा,आज मला श्रीखंडपुरी खायला मिळाली तर ऊद्या मला पंचपक्वाने खावीशी वाटणार. म्हणजे भुक कुठे तरी थांबवावी लागणार. पण हा अज्ञानातून जन्म पावलेला भ्रम आहे. प्रत्येक क्षेत्रात वावरत असताना आपण किती काळ थांबयचे कुठे थांबायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे असते .त्यासाठी तुम्ही सदगुरू च्या विचारसरणीचा अभ्यास केला पाहिजे. खरे सुक्ष्म,अद्रुष्य, अतिंद्रिय,अविनाशी सद् वस्तु विश्वात व्यापून आहे तीच आत्मरूपाने आपल्या अंतर्यामी वास करत असते. आपलेहे शरीर म्हणजे पंचमहाभूतांचे गाठोडे आहे. विचाराने ते बाजूला सारले. तर स्वस्वरूप शिल्लक रहाते. म्हणून श्री समर्थ सांगतात की, 'विवेकाने देहबुध्दीचा बंध उकलावा. 'व्यर्थ वाचाळता करू नये. स्वतःच्या विवेकाने वागावे. स्वरूपानुसंधान ठेवावे म्हणजे दृश्य  आपोआप ओसरू लागते व अखेर मोक्ष मिळतो. प्रथम अध्यात्मश्रवण,नंतर सद्‌गुरूवचन पालन,मग त्यांच्याप्रती शरणागति आणि शेवटी त्यांच्याच आशिर्वादाने स्वरूपानुभव असा परमार्थ मार्ग आहे. या मार्गाने जाऊन आत्मसाक्षात्कार झाल्यावर हा देह प्रारब्दावर टाकावा व स्वतः चे कल्याण करून घ्यावे. आपले जीवन स्वानंदरसात भिजवून टाकावे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


# हेतू शुद्ध ठेवावा

आधुनिक केसरी

मनुष्याने शुद्ध हेतू ठेवण्याचा प्रयत्न करावा. हेतू शुद्ध असला की स्वाभाविकच कृती त्याला अनुरुप होऊ लागते आणि प्रगतीला मदत होते. हेतू हा विहिरीत असणाऱ्या झऱ्याप्रमाणे आहे. झरा गोड पाण्याचा असला म्हणजे विहिरीचे पाणी स्वाभाविकच गोड असते. म्हणून हेतू शुद्ध ठेवण्याची दक्षता घ्यावी आणि त्याकरिता रामाची प्रार्थना करावी.

माणसाला देहरक्षणापुरते अन्न, वस्त्र आणि नाम घेण्याची बुद्धी असली की असमाधानाला जागा नाही. 'नको दैन्यवाणे जिणे भक्ति उणे' हेच रामराया जवळ मागावे.

पर्वकाळात भगवंत कामधेनूचा अवतार घेतो; जे ज्याला पाहिजे ते त्याला देतो. पर्वकाळात सज्जन तसेच दुर्जनही आपली कामे करून घेतात. जारण-मारण ही देखील पर्वकाळांतच शीघ्र साध्य होतात. आपण मात्र भगवंताचे कसे व्हावे हे पहावे. शुभेच्छा धरावी, भावना जागृत करावी. 'काहीही कर, पण भगवंता तुझा विसर पडू देऊ नकोस.' असे भगवंताजवळ मागावे. 'आजवर कळत नकळत जे पाप झाले असेल ते नाहीसे कर. पुढे पुनः नाही करणार,' असे म्हणावे, म्हणजे मागली पापे नष्ट होतात. ज्याला विषयाची गोडी असते त्याला



नाही परमार्थाची गोडी लागत. त्यांना 'मीच काय तो शहाणा, मोठा' असा अभिमान असतो. पण त्यांच्यापेक्षा लक्षावधी शहाणे आणि श्रीमंत जगात आहेत हे ते जाणत नाहीत. ते खालच्या लोकांकडे पाहतात आणि त्यांच्याहून मी श्रेष्ठ आहे असे म्हणतात. माझे चुकते आहे एवढे कळले तरी चालेल. विषयी लोकांना 'मला कुठे दुःख आहे' असे वाटते. पण दारूप्रमाणे विषयाची धुंदी उतरली म्हणजे पश्चात्ताप होतो. 'देव आहे' असे खऱ्या अर्थाने वाटणारे जगामध्ये थोडेच असतात. सद्‌विचार, सच्छास्त्र आणि सद्‌बुद्धि हे प्रत्येक माणसाला याच जन्मात भगवंताकडे नेण्यासाठी आहेत. प्रपंचाचा अनुभव कष्टमय आहे, पण भगवंताचा अनुभव आनंदमय आहे. तापाने आजारी असलेल्या माणसाला आपल्याला घाम यावा असे वाटत असते. पण नुसत्या वाटण्याने काही तो येत नाही, त्यासाठी डॉक्टरचे औषध घ्यावे लागते. तसे, ज्याला भगवंताचे प्रेम यावे असे वाटते, त्याने नाम घेणे हेच एक औषध घ्यावे. भगवंताचे प्रेम एकदा चिकटले की त्याच्या आड दुसरे काही येत नाही. खाणीतल्या दगडामध्ये जसे सोने असते, तसा आपल्यामध्ये परमात्मा आहे. दगडातली माती अनेक चाळण्यांनी आणि यंत्रांनी काढून टाकतात आणि नंतर सोने हाती लागते, त्याचप्रमाणे अनेक वासना नष्ट झाल्यानंतर परमात्मा आपल्या हाती लागतो. आपण 'मी' पणाने मेल्यानंतर शेवटी परमात्मा प्रकट होतो.

**शुद्ध असावे आचरण ।तसेच असावे अंतःकरण ।**
**त्यात भगवंताचे स्मरण ।हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन ॥**

# स्पर्धेच्या जगात टिकण्यासाठी कष्ट व चिकाटी आवश्यक : डॉ.मिलिंद पाटील

## साने गुरुजी विद्यालयात दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** विद्यार्थ्यांनी यशाचे सातत्य टिकवण्यासाठी मेहनत घेणे आवश्यक आहे. स्पर्धेच्या जगात टिकण्यासाठी कष्ट व चिकाटीची आवश्यकता आहे. तसेच विद्यार्थ्यांनी ध्येय ठरवून यशोशिखर गाठण्यासाठी प्रयत्न करावेत व आपण जीवनात कीतीही मोठे झालो तरी शाळेचे ऋृण विसरु नका असे मत संस्थेचे अध्यक्ष मिलिंद पाटील यांनी कन्नड येथील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा प्रसंगी व्यक्त केले आहे.

इयत्ता दहावीत गुणवत्ता प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यालयाच्या या यशाबद्दल साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मिलिंद पाटील व सचिव टी.एस कदम, मुख्याध्यापक धैर्यशील केरे, मुख्याध्यापक भगवान ठाकरे, संस्था प्रतिनिधी नितीन पाटील यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार करण्यात आला.

शहरातील साने गुरुजी विद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देते. आपला विद्यार्थी घडला पाहिजे स्वतःच्या पायावर उभा राहिला पाहिजे जीवनात त्याने मोठे यश संपादन केले पाहिजे. हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आमच्या साने गुरुजी विद्यालयातील शिक्षक अध्ययन-अध्यापन करीत असतात. म्हणूनच तर शहरासह तालुक्यात साने गुरुजी विद्यालयातील विद्यार्थी नेहमी अभ्यासात, खेळात, गुणवंत यादीत अव्वल असतात असे मत संस्थेचे सचिव टी.एस.कदम यांनी व्यक्त केले आहे.

मुख्याध्यापक धैर्यशील केरे म्हणाले की, नेहमीप्रमाणे या वर्षीही शाळेचा निकाल हा ९९ टक्के लागला आहे. याचे पूर्ण श्रेय आमच्या शाळेतील शिक्षकांना जाते असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेळके तर आभार शिवराज पाटील यांनी मानले यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.मिलिंद पाटील, सचिव टी.एस.कदम, शाळेचे मुख्याध्यापक धैर्यशील केरे, मुख्याध्यापक भगवान ठाकरे, संस्था प्रतिनिधी नितीन पाटील तसेच पालक, गुणवंत विद्यार्थी यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

सोहळ्यात अनुष्का पाटे ९८.८० टक्के, स्नेहा पवार ९५.२० टक्के, प्रज्वल पाटील ९५ टक्के, संस्कृती पवार ९४ टक्के, पार्थ गवळे ९३.८० टक्के, प्राची खरगे ९३.२० टक्के, आरती पवार ९२.६० टक्के, गायत्री शिरसाट ९२.४० टक्के, मयुरी दांडेकर ९१.४० टक्के, तनुजा मालुसरे ९०.८० टक्के, सोनाली हाडोळे ९० टक्के, यशराज आहेर ९० टक्के, नूतन ढाकणे ८९.८० टक्के, शंतनू पवार ८९.६० टक्के, शितल दाभाडे ८९.४० टक्के, वर्षा चव्हाण ८९.२० टक्के या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# ढोरकिन येथील वरिष्ठ तंत्रज्ञ लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज



**आडूळ :** पैठण तालुक्यातील ढोरकिन विभाग येथील एक वरिष्ठ तंत्रज्ञ लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकला आहे.

सविस्तर माहिती अशी की, तक्रारदाराच्या घराच्या जवळुन थ्री फेज विद्युत तारा गेलेल्या आहेत. त्यातील एक तार वाऱ्याने तुटुन तक्रारदार यांचे घराजवळ पडली होती. त्यामुळे त्या तारा सुरक्षीत घरापासून लांब बाजुच्या पोलवर लावुन देण्यासाठी वरिष्ठ तंत्रज्ञ यांनी ४,०००/- पंचासमक्ष स्वीकारले असल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरिल घटनेतील आरोपी लोकसेवक किशोर बप्पासाहेब आगळे, पद-वरिष्ठ तंत्रज्ञ, नेमणुक- ढोरकिन महावितरण 33 केव्ही 11 विभाग, ता.पैठण असे आरोपी चे नाव आहे.

औद्योगिक पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत चालुच होती. ही कार्यवाही पोलिस अधिक्षक डॉ.राहुल खाडे, अप्पर पोलिस अधीक्षक विशाल खांबे, पोलिस उप अधीक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक नंदकिशोर क्षीरसागर, पो अं.नागरगोजे, भुषण देसाई, सोमिनाथ थिटे यांनी केली आहे.

# औरंगाबादेतील पाच दुकानांना भीषण आग

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शहरातील शहागंजमधील मनपाच्या चेलीपुरा उर्दू शाळेच्या परिसरातील एका गोदामासारख्या जागेत असलेल्या पाच दुकानांना आज (गुरुवार) दुपारी दीड वाजेच्या सुमारास आग लागली. फळ, गॅरेज, सुकामेव्याच्या या दुकानांना लागलेल्या आगीत २० ते २५ लाखांच्या नुकसानीचा प्राथमिक अंदाज आहे. पदमपुरा व सिडकोच्या दोन बंबांसह १२ जणांच्या पथकाच्या मदतीने अर्धा तासात पाचही दुकानांची आग आटोक्यात आणल्याची माहिती पथक प्रमुख एल. टी. कोल्हे यांनी दिली.

अन्वरखान यांचे पेंडखजूरचे, सय्यद इर्शाद सय्यद मोमीन यांचे चप्पल-बुटाचे, सलीम बागवान यांचे फळाचे, सलीम शेख यांचे ड्रायफ्रूट तर मोहम्मद हुसेन चौधरी यांचे मोटार दुरूस्तीचे गॅरेज आहे. त्यांच्या दुकानात चार दुचाकी व काही चारचाकीही दुरुस्तीसाठी आलेली वाहने आगीत खाक झाली. सुकामेवा, फळे, वाहने दुरुस्तीचे साहित्यही आगीच्या भक्ष्यस्थानी आले.

# पळशी झाशी येथे वीज पडून दोघांचा मृत्यू तर दोघे जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**संग्रामपूर :** आज २३ जून रोजी दुपारच्या वेळी विजांच्या गडगडाटासह संग्रामपूर तालुक्यासह पळशी झाशी शिवारात जोरदार पावसाला सुरवात झाली. भरपावसात पळशी झाशी शिवारातील शुभम हेलगे यांच्या शेतात क्रेनद्वारा विहिरीचे खोदकाम सुरु होते. पाऊस सुरु असतानाच अचानकपणे वीज पडून विहिरीवर क्रेनद्वारा खोदकाम करत असलेले संजय उत्तम मारोडे वय ५५ वर्ष तर रवी संजय भालतडक वय ३५ वर्ष यांचे अंगावर विज पडून त्यांचा जागीच मृत्यू झाला.

२३ जूनला दुपारच्या वेळी विज पडून यात दोघांचा मृत्यू झाला असून तीथेच काम करणारे मंगेश मनोहर बाखरे व बंडू मधूकर मारोडे यांनी आपले कपडे पावसाने भिजतील या कारणाने ते थोडे अंतरावर एका आडोशाला गेले त्यामुळे ते सुद्धा जखमी झाले आहेत. नशीब बलवत्तर म्हणून ते यामधून बचावले.

जखमी झालेल्या दोघांनाही गावातील लोकांनी संग्रामपूर येथे उपचारासाठी दाखल केले मात्र तेथून त्यांना रूग्णवाहिकेव्दारे



शेगावला रवाना करण्यात आले. संजय उत्तम मारोडे हे अल्पभूधारक असून त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, २ मुली आहेत. रवि संजय भालतडक यांच्यामागे १ मुलगा, १ मुलगी, पत्नी असा परिवार आहे.

# राजेंद्र बंब यांच्या अवैध सावकारी प्रकरणात पुन्हा मोठा छापा

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** जिल्ह्यात पुन्हा राजेंद्र बंब यांच्या अवैध सावकारी प्रकरणात पोलिसांनी आणखी एक छापा टाकला असून यात लॉकरचा मोठा खुलासा करत प्रकरणांतील सहआरोपी संजय जीवनलाल बंब याचे व मुख्य आरोपी राजेन्द्र जीवनलाल बंब हाताळत असलेल्या लॉकरची झडती घेतली असता त्यात 77,93,000 रोख रक्कम, 149 ग्रॅम सोने 7,51,000 रुपयाचे, राजेन्द्र बंब याने कर्जदारांकडून करून घेतलेल्या सौदा पावत्यापोटी घेतलेले 490 पेक्षा जास्त कोरे चेक व 244 पेक्षा जास्त कोरे स्टॅम्प पेपर तसेच इतर व्यक्तिच्या नावाच्या बेनामी मुदत ठेवीच्या 260 पावत्या असे जप्त करण्यात आले आहेत.

तसेच नमुद प्रकरणी आजपावेतो झालेल्या छापा कारवाई दरम्यान मिळून आलेले सोने चांदी दागिन्यांची शुध्दता, वजन आणि मुल्यांकनकामी प्रणव बहाळकर, शासनमान्य मुल्यांकनकर्ता धुळे यांचे सहकार्य लाभले आहे. तसेच प्रविणकुमार पाटील, पोलीस अधीक्षक धुळे यांनी जनतेला असेही आवाहन केले आहे की, राजेन्द्र बंब याने कोणा कर्जदाराच्या मालमत्तेचे कागदपत्र गहाण अगर सौदा पावती करुन ठेवून घेतले असल्यास त्यांनी आर्थिक गुन्हे शाखेशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव व पोलीस उपअधीक्षक ईश्वर कातकाडे यांच्या मार्गदर्शनात आर्थिक गुन्हे शाखेचे हेमंत बेंडाळे, सहायक पोलीस निरीक्षक हर्षवर्धन बहिर, पोलीस उपनिरीक्षक असई हिरालाल ठाकरे, पोलीस हवलदार गयासुद्दीन शेख, भूषण जगताप, रविद्र शिंपी, मनोज बावीस्कर, राजू गिते, मनोज चौधरी, सावकारांचे सहायक निबंधक तथा उप - निबंधक, सहकारी संस्था, व राजेन्द्र विरकर, सहकार अधिकारी (प्रथम श्रेणी) सहकारी संस्था धुळे तालूका जि.धुळे अशांनी संयुक्तिकपणे श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत शाखा - देवपूर धुळे येथे छापा कारवाई केली.



# ८ ऑगस्टला चांदूर रेल्वे येथे होणार अ.भा.ग्रा. पत्रकार संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन

आधुनिक केसरी न्यूज

**चांदूर रेल्वे :** अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक केंद्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक शासकीय विश्रामगृह येथे घेण्यात आली. या बैठकीमध्ये अ.भा. पत्रकार संघाचे एक दिवसीय राज्यस्तरीय अधिवेशन येत्या ८ ऑगस्टला राम गणेश गडकरी सभागृह, ठाणे येथे आयोजित करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली.

या बैठकीला प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय सचिव अशोक पवार, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलासबापू देशमुख, प्रदेश सरचिटणीस प्रा.रवींद्र मेंढे, महाराष्ट्र प्रदेश संपर्क प्रमुख बाळासाहेब सोरगीवकर आदी मान्यवर उपस्थित होते. या बैठकीमध्ये पत्रकारांचे प्रश्न व समस्या यासह विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलास बापू देशमुख यांनी अखिल भारतीय पत्रकार संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन ८ ऑगस्ट रोजी राम गणेश गडकरी सभागृह, ठाणे येथे आयोजित केले असून संपूर्ण राज्यातील सर्व पत्रकार मंडळी या अधिवेशनाला उपस्थित राहणार असल्याचे सांगितले. तर अध्यक्षीय भाषणातून केंद्रीय कार्याध्यक्ष युसुफ खान यांनी अ.भा.ग्रा. पत्रकार संघ पत्रकारांच्या हित व संरक्षणासाठी काम करीत असून पत्रकारांनी या संघटनेत सामील व्हावे असे आवाहन यावेळी केले.

यावेळी पत्रकार संघाच्या वतीने महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रा.रवींद्र मेंढे व जिल्हा कार्यकारिणी सहसचिव धीरज नेवारे यांचा वाढदिवस केक कापून व पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देत उत्साहात साजरा केला. केंद्रीय कार्यकारिणीचे इतर पदाधिकारी झूम मिटींगवरून या बैठकीला उपस्थित होते. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष उत्तमराव गावंडे, जिल्हा सहसचिव धीरज नेवारे, तालुकाध्यक्ष इरफान पठाण, तालुका उपाध्यक्ष मंगेश बोबडे, सचिव राजीव शिवणकर, अमोल गवळी, राजेश सराफी, राहुल देशमुख, विनय गोटफोडे, शहजाद खान, प्रशांत सिसोदिया, मनिष खुने यांसह अनेक पत्रकार उपस्थित होते.




# ‘ऑपरेशन कमळ’ भाजप वापरणार ?

आधुनिक केसरी

विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमधील सत्ता अस्थिर करण्याकरिता भाजपने विविध राज्यांमध्ये ‘ऑपरेशन कमळ’ हे अभियान राबविले होते. कर्नाटक, मध्य प्रदेशात हे अभियान यशस्वी झाले आणि सत्ताबदल होऊन भाजप सत्तेत आला होता. राजस्थान, पश्चिम बंगालमध्ये ते यशस्वी होऊ शकले नाही. महाराष्ट्र हे भाजपच्या राजकारण आणि अर्थकारणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे राज्य. तेव्हा महाराष्ट्रातही असे अभियान राबविण्याकरिता भाजपच्या नेत्यांची चाचपणी केली होती. पण सरकार स्थापनेएवढे संख्याबळ होत नव्हते. त्यातच महाविकास आघाडीचे आमदार सावध होते. पण आता एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे महाविकास आघाडीचे सरकार कोसळणार हे निश्चित झाले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी ‘वर्षा’ हे शासकीय निवासस्थानही सोडले. या साऱ्या घडामोडींमुळे भाजपला ऑपरेशन कमळ हे राज्यात राबविण्याची वेळच आली नाही. विरोधी पक्षांची सत्ता असेल्या राज्यांमधील सरकारे अस्थिर करण्याकरिता किंवा स्वतःचे संख्याबळ वाढविण्याकरिता ही खेळी केली गेली. यात सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी आमदारकीचे राजीनामे देऊन सरकार अल्पमतात आणायचे. सत्ताधारी पक्षाचे संख्याबळ घटल्याने भाजपकडून लगेचच सरकार स्थापण्याचा दावा केला गेला. मग पोटनिवडणुकांमध्ये या आमदारांना भाजपकडून उमेदवार देऊन निवडून आणण्याकरिता मदत केली होती. हे आमदार पुन्हा पोटनिवडणुकांमध्ये विजयी झाले होते. महाराष्ट्रात हा प्रयोग राबविण्याची भाजपची योजना होती. परंतु पुरेशा आमदारांचे पाठबळ लाभले नाही. तसेच १४४ हा जादुई आकडा गाठला जात नव्हता. तसेच राजीनामा देऊन भाजपच्या वतीने निवडून येण्याची महाविकास आघाडीतील आमदारांना खात्री नव्हती. यामुळेच राज्यात हा प्रयोग भाजपला करता आला नव्हता. आता मात्र एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे एकदम ३५ ते ४० आमदारांचे पाठबळ लाभणार आहे. भाजपला आयतेच संख्याबळ लाभले. यामुळे राज्यात ऑपरेशन कमळ या अभियानाची भाजपला गरज भासणार नाही.

# सामाजिक बदलासाठी सावित्रीच्या लेकीचे योगदान गरजेचे!!



भूमिपुत्र वाघ
संपर्क क्र. 9172972482

आधुनिक केसरी

**भारतीय संविधानाने दिलेले अधिकार आज लोक वाचत आहेत. बोलत आहेत. भावना व्यक्त करत आहेत. आणि म्हणून भविष्यामध्ये सावित्रीच्या लेकी या समाज बदलाच्या मुख्य भागीदार होतील. आणि होत आहेत. सध्या आई-वडिलांच्या मृत्यूनंतर महिला, मुली, सुना, आई-वडिलांच्या ताटीला खांदा देत आहेत. सिकाळ धरीत आहेत. पाणी पाजताना पाहत आहोत. ही बदलाची नांदी परिवर्तनाची ठरोत. महिलांना बाजूला ठेवणाऱ्या, बाजूला सारणाऱ्या, बहिष्कृत करणाऱ्या, चालीरीतीच्या वहीवाटी बदलताना आम्ही पाहत आहोत. हे बदल सावित्रीच्या लेकी करीत आहेत.**

मित्रांनो भारतिय संस्कृती ही पुरुषप्रधातेवरती आधारलेली आहे. जगाच्या पातळीवर ज्या धर्मव्यवस्था, राजसत्ता निर्माण झाल्या. त्या निर्माण करताना त्या त्या धर्माचे धर्मगुरू अगर पुरुष असतील तर त्या पुरुषांनी त्यांच्या सुविधेसाठी धर्मातले अनेक रीतिरिवाज, परंपरा पुरुषांच्या सोयीसाठी राखून ठेवलेले दिसतात. असेच म्हणावे लागेल.

भारतीय संस्कृतीमध्ये महिलांचा अवमान करणाऱ्या, अपमान करणाऱ्या, वाळीत टाकणाऱ्या अनेक चालीरीती हळूहळू मागे जाताना आपण पाहत आहोत. भारतामध्ये सतीची चाल किती भयानक होती. बाल वयामध्ये लग्न व्हायची. दवाखान्याची सुविधा नसायची. दहा-अकरा पंधरा वर्षाची कोवळी लेकर मेल्यानंतर त्या छोट्या मुलीला त्या पतीच्या सरणावरती बसावं लागतं असे. तिला त्या नवऱ्यासोबत सती जावं लागायचं. ते बदलण्यासाठी राजाराम मोहन रॉय, राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सवित्रिमाता फुले आणि भारतीय संविधानाचे जनक विश्ववंदनीय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी, समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व या चार खांबावरती प्रत्येकाला समान अधिकार देऊन भारतीय संविधान समर्पित केले. यामुळे कोणाला आत्महत्या करता येणार नाही. कोणाला सती जाता येणार नाही. म्हणून हजारो जीव वाचायला मदत झाली.

दुसऱ्या बाजूने थोडासा विचार केला तर बरेच सन हे पुरुषांच्या पूजेसाठी, उपवासासाठी निर्माण केलेले दिसतात. भावाचा उपवास, नवऱ्याचा उपवास, वडिलांचा उपवास, देवी-देवतांचा उपवास, पूजाअर्चा सर्व बाईच्या माथी मारून तिला उपवाशी मारण्यात आणि दैववादांमध्ये गुरफटून टाकण्यात भारतीय संस्कृतीने खूप मोठी मजल मारलेली दिसते. त्या काळात सर्वच जातीतील स्त्रीला शुद्र मानले जायचे. चूल आणि मूल या पलीकडे तिला कुठलंही स्वातंत्र्य दिलं नव्हतं. महिलांचा सन्मान करणारा एकही सण भारतीय संस्कृतीमध्ये दिसून येत नाही. एकही उपवास महिलांना सन्मानित करण्यासाठी का नाही? किंवा आईसाठी, बहिणीसाठी, पत्नीसाठी, लेकीसाठी कोणी पुरुष उपवास धरताना दिसत नाही. किंवा तशी संधी धर्माने पुरुषांना दिली नाही. ही पण खूप मोठी शोकांतिका आपण पाहत आहोत.

अगदी जन्म झाल्यापासून मृत्यू होईपर्यंत जाणून बुजून बऱ्याच धार्मिक सणांमध्ये महिलांना बाजूलाच सारलं. नाहीतर त्यांना बहिष्कृत केलेले दिसते. आता पहा पूजाअर्चा करणे, धार्मिक कार्यक्रम करणे अशा वेळी बाईला डाव्या बाजूला बसवले जाते. अद्यापपर्यंत या काच उत्तर मला तरी मिळालेले नाही. विधवा महिलांचा विचार केला तर सर्व धार्मिक कार्यक्रमांमध्ये तिला येऊ दिले जात नाही. निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांना विचारले जात नाही. कितीतरी बारकावे आपण अभ्यासायला लागलो तर लक्षात येईल. पुरुषप्रधानता ही कायम महिलांचा वापर करणारी अशीच दिसून येते. म्हणून कधी कधी वाटते की ह्या अशा वाईट रीती रीवज ज्यामध्ये महिलांचा अवमान होतो, त्या सर्व पायदळी उडवणाऱ्या सावित्री, जिजाऊच्या लेकी निर्माण होण्याची गरज आहे. ज्या महोत्सवात लेकी बाळीचा सन्मान होईल. तिला बोलता येईल. तिच्या अधिकारांचा सन्मान होईल. ती मत मांडू शकेलं. ती निर्णय घेऊ शकेल. अशी समाजव्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

एका बाजूला आपण पाहतो आहोत की पतीच्या मृत्यूनंतर बाईचे सौभाग्य छिनले जाते. तिला धार्मिक कार्यातून जणू बहिष्कृत केले जाते. ही किती वाईट गोष्ट आहे!!! आणि तिला विधवा म्हणून संबोधलं जातं. नाही तर तिला बहिष्कृतही केले जाते. खऱ्या अर्थाने दोघांच्या पैकी मृत्युसमयी जे कोणी मागे राहणारे असतील ते पती असो की पत्नी तेच खरे सोभाग्यवती. कारण त्यांना लेकरा बाळासोबत पुढील आयुष्य जगण्याची संधी मिळालेली असते. परंतु पुरुष प्रधानतेमध्ये पतीच्या निधनानंतर पत्नीचे सौभाग्य उतरवले जाते. त्याच सोबत ज्या घरात फक्त मुलीच जन्माला आल्या असतील त्या मुलींना आई-वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांना पाणी पाजण्याचा अधिकार या संस्कृतीने दिला नाही. भावकितील इतर लोक पाणी पाजतात. जेव्हा आपण मयतांना स्मशानभूमीकडे घेऊन जातो, तेव्हा खांदा देण्याचा अधिकार महिलांना दिला नाही. हे सगळं आपण पाहात आलो. म्हणून सहन करतो. परंतु विचार करायला लागलो तर.... का नाकारल मुलीला? हा प्रश्न महिलांना का सतावत नाही! आणि मुली का बंड करून उठत नाहीत? अजून हा प्रश्न अधांतरीच आहे ? पाणी पाजण्याचा, शिकाळ धरण्याचा, खांदा देण्याचा अधीकार मिळाला पाहिजे की नाही! मिळणार नाही म्हणून गप्प बसण्यापेक्षा तो मिळवीला पाहिजे. ही मानसिकता महिलांमध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. ही बदलाची नांदी हळूहळू आता सुरू झालेली आहे. ती वाढली पाहिजे. पुरुषांनीही जाणून बुजून पाठिंबा दिला पाहिजे. तर भविष्यात या मुलींना अधिकार मिळून जाईल. समाजाच्या लक्षात येईल तसतसे सध्या बदल होत आहेत.

भारतीय संविधानाने दिलेले अधिकार आज लोक वाचत आहेत. बोलत आहेत. भावना व्यक्त करत आहेत. आणि म्हणून भविष्यामध्ये सावित्रीच्या लेकी या समाज बदलाच्या मुख्य भागीदार होतील. आणि होत आहेत. सध्या आई-वडिलांच्या मृत्यूनंतर महिला, मुली, सुना, आई-वडिलांच्या ताटीला खांदा देत आहेत. सिकाळ धरीत आहेत. पाणी पाजताना पाहत आहोत. ही बदलाची नांदी परिवर्तनाची ठरोत. महिलांना बाजूला ठेवणाऱ्या, बाजूला सारणाऱ्या, बहिष्कृत करणाऱ्या, चालीरीतीच्या वहीवाटी बदलताना आम्ही पाहत आहोत. हे बदल सावित्रीच्या लेकी करीत आहेत.

भविष्य मध्ये आम्हाला शिकावं लागेल. संघटित व्हावे लागेल. आणि भारतीय संस्कृतीतल्या वाईट चालीरिती रिवाज ज्या महिलांना बहिष्कृत करतात, त्या पायदळी तुडवाव्या लागतील. आणि नव्या विचाराचा समाज, नव्या विचारांची संस्कृती आम्हाला निर्माण करावी लागेल.

# लिबरल आर्ट्स : तिन्ही शाखांचं शिक्षण मिळणार एकाच अभ्यासक्रमात



सुनील शिरपुरे
संपर्क क्र. 7057185479

आधुनिक केसरी

**गेल्या काही वर्षांमध्ये लिबरल आर्ट्स या शाखेने शैक्षणिक क्षेत्रात आपले वेगळे व उल्लेखनीय स्थान निर्माण केले आहे. सोशल सायन्सेस, आर्ट्स आणि ह्युमॅनिटीज यांचा लिबरल आर्ट्सच्या या शाखेत समावेश होतो. यामधील तुम्हाला आवड असलेल्या निवडक विषयांचा समावेश तुम्ही तुमच्या लिबरल आर्ट्सच्या अभ्यासक्रमाध्ये करू शकता.**

एकाच शाखेतील शिक्षण घेतलं की, त्याच शाखेत आपल्याला करिअर करावं लागतं. पण, तिन्ही शाखांचा अभ्यास एकाच कोर्समध्ये करता आला, तर नोकरीच्या संधीच संधी निर्माण होतात. पुण्यातील एमआयटीने लिबरल आर्ट्सचा कोर्स सुरू केला आहे.

दहावी-बारावीच्या निकालांनंतर आर्टस्, कॉमर्स, सायन्सनंतर आता मेडिकल, फायनान्स की इंजिनीअरिंगला जावून करिअर करायचं की, ऑफबीट कोर्स निवडायचा. अशा अनेक प्रश्नांनी आतापर्यंत तुम्हाला भंडावून सोडलं असेल. पण, या सर्व पर्यायांना दूर ठेवून आपल्या आवडीच्या विषयात करिअर करायची इच्छा असेल, तर त्यासाठी वेगळा पर्याय आता उपलब्ध झाला आहे. आणि तो पर्याय म्हणजे एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीमधील लिबरल आर्ट.

लिबरल आर्ट्स या विषयात तुम्हाला आवडीच्या विषयात शिक्षण घेणे शक्य होत असून पारंपरिक शिक्षणापेक्षा हा वेगळा अनुभव ठरणार आहे. लिबरल आर्ट्सचे शिक्षण घेणे म्हणजे अनेक गोष्टी एकत्र शिकणे असा त्याचा अर्थ नसून पुस्तकांव्यतिरिक्त आजूबाजूच्या अनेक बाबींचे शिक्षण घेण्यासाठी मनाला प्रशिक्षित करणे, असे उद्‌गार नोबेल पुरस्कार विजेते प्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आइनस्टाइन यांनी काढले होते. हाच अनुभव ही पदवी घेताना तुम्हाला येईल.

गेल्या काही वर्षांमध्ये लिबरल आर्ट्स या शाखेने शैक्षणिक क्षेत्रात आपले वेगळे व उल्लेखनीय स्थान निर्माण केले आहे. सोशल सायन्सेस, आर्ट्स आणि ह्युमॅनिटीज यांचा लिबरल आर्ट्सच्या या शाखेत समावेश होतो. यामधील तुम्हाला आवड असलेल्या निवडक विषयांचा समावेश तुम्ही तुमच्या लिबरल आर्ट्सच्या अभ्यासक्रमाध्ये करू शकता.

जर तुम्हाला राज्यशास्त्र या विषयात रूची असेल तर राज्यशास्त्राबरोबरच संगणक आणि स्टॅटिक्स या विषयांची निवड करीत तुम्ही निवडणूक व मतमोजणी विश्लेषक अर्थात मानसशास्त्रज्ञ म्हणून अधिक प्रभावीपणे काम करू शकता. जर तुम्हाला साहित्य या विषयात रस असेल तर साहित्य या विषयाबरोबर तुम्ही त्याला मॅनेजरिअल स्टडीची जोड देऊन पब्लिशिंग व्यवसायात स्वतःचा वेगळा ठसा उमटवू शकता.

याशिवाय लिबरल आर्ट्स या पदवीमध्ये पारंपरिक विषयांबरोबरच समकालीन विषयांच्या जोडीने तुम्ही अधिकाधिक नव्या गोष्टी शिकू शकता. या विषयामध्ये मानसशास्त्र, माध्यमे, मास मीडिया, पत्रकारिता, फाईन आर्ट्स, वैदिक विज्ञान, परफॉर्मिंग आर्ट्स या विषयांचा समावेश होतो. एकूणच काय तर... लिबरल आर्ट्सच्या माध्यमातून कला, वाणिज्य आणि विज्ञान या तीनही शास्त्रांच्या मर्यादेमधून बाहेर पडत तुम्ही प्रभावी व मुक्तपणे तुम्हाला आवडणा-या विषयांचे शिक्षण घेऊ शकता.

याबरोबरच लिबरल आर्ट्स खेरीज बी. ए. ऑनर्स या पर्यायाचादेखील तुम्ही विचार करू शकता. यामध्ये तुम्हाला राज्यशास्त्र, मानसशास्त्र आणि इंग्रजी अशा ठराविक विषयांमध्येच आवड आहे आणि करिअर करायचे आहे, तर सुरुवातीपासून तुम्हाला त्याच विषयाचा अभ्यास करण्याची संधी बी. ए. ऑनर्स या पदवीमध्ये मिळू शकते. या उलट ज्यांना एकापेक्षा जास्त विषयांमध्ये रस आहे आणि या सर्व विषयांचे एकत्रित ज्ञान घेऊन करिअर करण्याची इच्छा जे बाळगून असतील, अशांसाठी लिबरल आर्ट्स हा महत्त्वपूर्ण आणि उपयुक्त पर्याय आहे.

या कोर्सची फी किती आहे? एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीस्कूल ऑफ लिबरल आर्ट्सच्या प्रमुख प्रा. प्रीती जोशी यांनी सांगितले की, "मागील काही वर्षात पारंपरिक शिक्षणाची वाट सोडून ऑफबीट किंवा नवीन विषयात अभ्यास करण्याचा ट्रेंड दिसून येत आहे. नवनवीन पर्यायांचा शोध घेतला जातो आहे. यातलाच एक उत्तम पर्याय ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आहे. याची फी ६०,००० ते ३,५०,००० प्रति वर्ष आहे. तसेच या कालावधीत इंटर्नशिप हा ६-३० क्रेडिट्सचा अनिवार्य घटक आहे."

लिबरल आर्ट्सचा विचार केला तर सुदैवाने पुणे शहरात अनेक ठिकाणी या अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जाते. उच्च शिक्षणाच्या जगात नावाजलेल्या अनेक संस्थांमध्ये या विषयाचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. त्यामुळे या संधीचा नक्की फायदा घ्या. पब्लिकेशन हाऊसेस, क्रिएटिव्ह रायटिंग, ब्रँडिंग कम्युनिकेशन, मीडिया हाऊसेस, राजकीय विश्लेषक, सेफोलॉजिस्ट, कॉन्सेलर्स, शैक्षणिक, संशोधन इ. अशा विविध क्षेत्रात करिअरची विस्तृत व्याप्ती आहे. त्यामुळे नोकरीच्या संधीच संधी उपलब्ध होतील यात काही शंकाच नाही.

# नात्यातील ओलावा

आधुनिक केसरी

नात टिकवण्यासाठी फक्त चार गोड शब्दांचा संवाद पुरेसा असतो हो बाकी काहीच लागत नाही. आजच्या या सामाजिक माध्यमांच्या फेसबुक, व्हाटस् -ॲपच्या या आभासी जगात आपण तासन तास टंकलिखित संदेश एकमेकांना पाठवितो पण प्रत्यक्षात समोरासमोर भेटल्यावर संवादच करत नाहीत. एकतर आजच्या या धकाधकीच्या आयुष्यात आपल्या स्नेहीजणांशी मित्रांशी भेट प्रदीर्घ काळानंतर होते त्यानंतरही आपण सर्वजण एकत्र भेटल्यावर त्या भ्रमणध्वनीच्या पडद्यावर (मोबाईल स्क्रीन) मान झुकवून बसतोत. नातं रक्ताचे असो की मैत्रीचे ते नातं टिकवण्यासाठी वेळोवेळी संवाद आवश्यक असतो.कधीकधी काही गैरसमजूतीतून नात्यात कटूता निर्माण होऊन आपणच आपल्या अहंकारातून संवादाची दारे कायमची बंद करतो.आपण झाडाचे रोपटे खोल मातीत लावताना खत व पाणी टाकतो नंतरच त्या मातीतील ओलावा झाडाची मूळे कायमची पकडून ठेवतात. त्याचप्रमाणे आपल्या संवादातील चार शब्दांचा गोडवा हा नात्यातील ओलावा टिकवून ठेवायचे काम करतो व ते नाते चिरंतन राहते* महत्वाची बाबः- आपल्या चार गोड शब्दांमुळे स्नेहीजणांच्या मनात आपण कायमचे घर करून राहतो बरं संवाद साधताना त्या चार गोड शब्दांसाठी पैसे खर्च करायची गरज नाही. ते शब्दही आपल्याला मोफतच मिळतात. खरं तर देवाने फक्त मानवालाच शब्दरुपी संवाद साधण्याचे वरदान दिले आहे. आज नात्यात संवादच खुंटला आहे त्यामुळे नात्याचे झाड बहरतच नाही हे वास्तव आहे.



रामकृष्ण जोशी
संपर्क क्र. ९५२७४५४१८२

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# शेतकरी आणि जनसामान्यांच्या व्यथांचा : अंतस्थ हुंकार



प्रकाश क्षीरसागर
संपर्क क्र. ९०११०८२२९९

आधुनिक केसरी

**अंतस्थ हुंकार हा ग्रामीण परिसरातील बदलत्या स्थितीचा धांडोळा घेणारा कवितासंग्रह. 'कैवार' त्यांच्या या पहिल्याच कवितासंग्रहाला चाळीसहून अधिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. अर्थात पुरस्काराने त्या कवितांचे आणि संग्रहाचे मूल्यमापन होत नसले तरी जनसामान्यांना तो कितपत आवडला म्हणजे त्याला कितपत लोकाश्रय लाभला हेदेखील महत्त्वाचेच असते. 'कैवार' या कवितासंग्रहाला लोकाश्रय आणि परीक्षकांश्रयदेखील लाभला. त्यांनी 'कैवार'मधून शेतकरी, शेतमजूर आणि जनमानसाच्या कविता अगदी साध्या सोप्या शब्दांत आणि छंदांतून या संग्रहातून मांडल्या आहेत. त्यांचा हा दुसरा 'अंतस्थ हुंकार' कवितासंग्रहदेखील पहिल्या कवितासंग्रहापाठोपाठ त्याच वाटेने जाणारा आहे.**

ओवी, अभंग अशा ग्रामीण परिसरातील लोकांना मुखोद्गत असणाऱ्या छंदात ते लिहितात. बहिणाबाई चौधरी यांनी अष्टाक्षरीमधून लोकांना सामान्यांच्या व्यथा विशेषतः स्त्री जीवनाच्या समस्या समजावून सांगितल्या. ग्रामीण जनतेचा ठाव घेण्याचा प्रयत्न शिवाजीराव शिंदे यांनी या संग्रहातून केला आहे. अंतस्थ हुंकारची सुरुवातच लहरी पावसाचा वेध घेण्यापासून होते.

**पाऊस धोधार । स्थिती ही गंभीर ।**
**चोहिकडे पूर । कोकणात ।**

असे कोकणच्या पुराचे वर्णन करतानाच इतरत्रही पावसाने मांडलेला कहर शेतकरी व ग्रामीण माणसांच्या तोंडचे पाणी पळवणारा कसा ठरतो याचा लेखाजोखा मांडतच शिवाजीरावांनी या कवितेच्या शेवटी विठ्ठलालाचा साकडे घालून वाचवण्याची विनंती केलीय. ते म्हणतात,

**विठू निसर्गाचा । थांबव तांडव ।**
**करू दे मांडव । पुन्हा उभा ।।**

गेल्या पावसात कोकणात आणि कोल्हापूर आदी परिसरात पावसाने गावेच्या गावे कवेत घेतली होती. कित्येकांची घरे व संसार वाहून गेला. तो पुन्हा नव्याने उभा करण्यासाठी हे विठ्ठला तू पावसाचे तांडव थांबव असे ते विनवतात. तसेच अवकाळी येणारा पाऊस हा कुणब्याचे जिणे मातीमोल करतो. या पावसाने आभाळ फाटते व नशीब फुटल्यागत शेतकरी व जनजीवन मातीमोल होतो हे 'अवकाळी पाऊस' या कवितेतून दिसते.

कवी ग्रामीण परिसरातून शहरात आलेले आहेत. त्यांच्यावर तेथील संस्कार आणि श्रद्धामय जीवनाचा प्रभाव आहेच हे दुसऱ्या 'प्रार्थना' या कवितेतून कळते. सर्व सद्गुण अंगीकारावेत, विशेषतः माणूसपण जपून भुकेल्यांसी अन्न हे संतवचन पाळण्याचे भान असायला हवे आणि सर्वांना समान वागणूक देण्याची वृत्ती जनमानसात असू दे, असे मागणे ते परमेश्वराकडे मागतात.

'अनाथांची माय' या नावावरूनच हल्लीच दिवंगत झालेली अनाथांची माय सिंधूताई सपकाळ यांना समर्पित ही कविता आहे, असे कळतेच. कोरोना नावाच्या महाभयंकर विकार आणि आजाराने जगभर थैमान घालून कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त केली. त्यात अनेकांचे मायबाप गेले. कोरोनाला हरवून परत सुखरूप घरी येण्याचे वचन आईबाबांना कोरोनाने पाळू दिले नाहीय मग त्या पोरक्या लेकरांची जी स्थिती झाली ते 'आईबाब हिरावल्यानंतर' या कवितेतून कवीने मांडली आहे. याच विषयावरील 'कोरोना महामारी' ही कविता अशीच विदारक परिस्थितीचे दर्शन घडवून विमनस्क करणारी आहे.


महाराष्ट्रातील अवघ्या जनांनाच पंढरीच्या परब्रह्माच्या दर्शनाची सदैव ओढ असते. कोरोनामुळे देव आणि भक्तांचीही ताटातूट झाली आहे, हे 'वारी' या कवितेतून कवीने सांगितले आहे. 'भक्ती' ही कवितादेखील परमार्थ करण्यास प्रवृत्त करणारी आहे. 'गुरू' या कवितेतून गुरुंचा महिमा वर्णन केला आहे.

आंतरराष्ट्रीय स्पर्धेत नीरज चोप्रा या तरुणाने सुवर्णपदक मिळवले त्याने संपूर्ण भारताची मान अभिमानाने ताठ झाली. त्याला मानाचा मुजरा करणारी 'सुवर्णयश' ही कविता आपल्यालाही गौरवान्वित करते.

'वाटणी' ही कविता ग्रामीण भागातील संघर्षाचे चित्रण करणारी आहे. ग्रामीण भागात कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करणारे शेतकरी आहेत तसेच मुलीच्या लग्नासाठी घेतलेले कर्ज न फेडता आल्याने जीवन संपवणारेदेखील आहेत. अशा हताश, निराश बापाची व्यथा कवीने 'व्यथा कन्येची' या कवितेतून प्रकट केली आहे.

'हल्ली गावाकडं जाणं जमत नाही' ही कविता शीर्षकाप्रमाणेच दीर्घ आहे. कवितेचा विषयच दीर्घ आहे. शहरात रमलेल्या पिढीला आता गावकडं करमत नाही, खेड्यातल्या मातीत मन रमत नाही. शहरीकरणाला रुळलेल्या (गावाकडून शहराकडं चार पाच वर्षांत स्थिरसावर झालेल्या) पिढीला आता गावाकडील लोकांबद्दल प्रेम, आपुलकी राहिली नाही ही वस्तुस्थिती सांगत आईबापापासून तुटल्यागत आणि त्यांच्याशी देण-घेणं उरलं नाही हे विदारक सत्य ही कविता सांगते. बालमित्रांनाही तो आताशा भेटत नाही. शहराकडे बायको-मुलांना घेऊन राहणाऱ्या पिढीचं वास्तव चित्र ही कविता उभं करते.

'बळीराजाची नशिबाने थट्टा केली!' अवकाळी पावसाने शेती आणि शेतकऱ्यांची होणारी दैना या कवितेत दिसते. 'नेत्यांचे दौरे' ही कविता शेतकऱ्यांची क्रूर विटंबना करणाऱ्या नेत्यांच्या वर्तनाकडे बोट करते. केवळ आश्वासने देऊन भुलवणारे नेते, फोटोसेशन




करून आपली हौस भागवणारे नेते आपला शब्द कधी पाळतील या आशेवर शेतकरी गुजराण करतो. हालाखीत दिवस काढतो. 'जगणं शेतकऱ्यांचं' आणि 'सांत्वनाचा भार' या कवितांतून एकीकडे निसर्ग नाडतो आणि दुसरीकडे नेते, राजकारणी व सरकार फक्त कोरडे सांत्वनच करतात. शेतकऱ्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर होतो. असं या कविता सांगतात.

**'शेजाऱ्याचं पाहून लावतो भरमसाठ कांदा**
**भाव पडल्यानं संकटात येतो जगाचा पोशिंदा'**

ही ओळ शेतकऱ्यांच्या व्यथेवर नेमकं बोट ठेवते.

'संकटांचा ससेमिरा' ही कविता शेतऱ्यांना दलाल आणि व्यापारी किती आणि तसे लुटतात असं सांगत चहुकडून आपत्तीत सापडलेला शेतकरी 'वैतागून एक दिवस ते जीवनालाच कंटाळतात । स्वतःच्याच शेतात शेतकरी फास घेऊन मरतात' आणि 'राजकर्त्यांना पाहिजे असतं टीकेसाठी कारण। पोशिंद्याच्या आत्महत्येचं होतं घाणेरडं राजकारण' हे शेतकऱ्याच्या नशिबाचं विदीर्ण चित्रण मनाला त्रासून जातं.

'विध्वंस महापुराचा' आणि 'साकडं' या दोन परस्परविरोधी कविता आहेत. 'चहुकडे एखच हाहाःकार उडाला। अनेकांचा संसार उद्ध्वस्त झाला'. हे अतिवृष्टीचं संकट आणि पुरामुळे झालेला विध्वंस तर दुसरीकडे 'पावसा पाहू नकोरे आमचा अंत । भर पावसलाळ्यात नको घेऊ उसंत' अशी विनवणी करत 'पावसा विनवणी करून घालतो साकडं मनसोक्त कोसळं, पाहिजे तेवढं पड।' आणि मग 'दुथडी भरून वाहू दे गावाकडची नदी। पिकांचं दान पडुदे पोशिंद्याच्या पदरामदी।' असं साकडं घालून शेतकरी मागणं मागतो. 'पोशिंद्याचं स्वप्न,' 'कुणब्याची पोरं' आदी कविताही शेतकऱ्यांचं जीवन चित्रित करतात.

'सामाजिक विदारकता' ही कविता समाजातील कोवळ्या कळ्यांवर होणारे अत्याचार, त्यांच्या हत्येविषयी चीड व्यक्त करते. कुणीतरी कृष्ण पुन्हा जन्माला यावा, अशी विनवणी कवी करतो. 'माणसे,' 'राजकारण', 'आयुष्यात काय कमवावं' आदी कविता समाजातील विषमता, लोकांची दुटप्पी भूमिका यांवर कोरडे ओढते.

'वडिलांचा मुलीला संदेश' ही कविता मुलीचा जन्म ते विवाह इथपर्यंतचा प्रवास वर्णन करते. 'संस्काराचं लेणं लेऊन जात आहेस । आठवणीचं देणं देऊन जात आहेस।' अशी मुलीच्या बापाची अवस्था वर्णन करणारी ओळ ते लिहून जातात.

एकंदरीत कविता संग्रह सामाजिक जाणिवांची कविता घेऊन आलाय. समाजातील विदारक चित्र पाहून उमटलेला अंतस्थ हुंकार ही कविता प्रकट करते. संतोष घोंगडे यांचे मुखपृष्ठ देखणे आणि कवितेला साजेसे आहे.

कविता संग्रह : अंतस्थ हुंकार
कवी : शिवाजी नारायणराव शिंदे
मुखपृष्ठ : संतोष घोंगडे, पृष्ठे ११२, प्रकाशक : हर्मिस प्रकाशन पुणे - ४११०६८

# अग्निवीरांची भरती योग्य परंतु...



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**विरोधी पक्षांनी अग्निपथ योजनेचा विरोध न करता त्यात नवीन काय करता येईल याकडे सरकारचे लक्ष केंद्रित करायला हवे. कारण हा प्रश्न देशाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा व संवेदनशील आहे. त्यामुळे विरोधक विरोधात आहे म्हणून विरोध करायचा असे होवू नये. सरकारने व विरोधी पक्षाने आंदोलकांशी सवीस्तर चर्चा करून उचित निर्णय घ्यावा. नौदल प्रमुख ॲडमिरल आर. हरी कुमार यांनी म्हटले की या योजनेवर इतका व्यापक हिंसा अपेक्षित नव्हती. म्हणजेच हिंसेची चिंता उच्च पदस्थ अधिकाऱ्यांसोबत संपूर्ण देशाला आहे.**

अग्निपथ सैन्य भरती अल्पावधीची असल्यामुळे युवकांमध्ये आक्रोश निर्माण झाल्याचे दिसून येते. सरकारला कोणतीही योजना राबवायची असेल तर त्याचा गांभीर्याने विचार करून जनतेसमोर किंवा युवकांसमोर आणला पाहिजे. अग्निपथ सैन्य भरती योजने अंतर्गत वयोमर्यादा 17.5 ते 21 वर्षे ठेवण्यात आली होती. ही वयोमर्यादा अत्यल्प असल्याने युवकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले. त्याचबरोबर मागील वर्षी लष्कर भरतीची प्रक्रिया झाली होती. अनेक विद्यार्थ्यांची शारीरिक व वैद्यकीय चाचणीही झाली होती. यात लेखी परीक्षा कधी होणार याची वाट युवक पहात आहेत.कारण सरकारने आतापर्यंत परीक्षाच घेतली नाही. असे आंदोलकांचे म्हणने आहे.त्यामुळे सरकारने सर्वप्रथम मागील वर्षीच्या लष्कर भरतीची प्रक्रिया पूर्ण करायला हवी होती. नंतर अग्निपथ योजना अंमलात आणायला पाहिजे होती. त्याचप्रमाणे अग्निपथ योजनेत काही तृटी असल्याचे सरकारच्या सुध्दा लक्षात आले. यामुळेच नवी दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, उत्तराखंड, राजस्थान, मध्यप्रदेश, हिमाचल प्रदेश, हरयाणा,जम्मु, तेलंगणा इत्यादी राज्यात अग्निपथ लष्कर भरती योजनेचा विरोध करत हिंसक वळण आल्याचे दिसून आले. यावर केंद्र सरकारने ताबडतोब सारवासारव करत अग्निपथ योजनेसंदर्भातील शंका आणि वस्तुस्थिती या शीर्षकाचे पत्रक केंद्रातर्फे दिनांक 16 जून 2022 रोज गुरूवारला जारी करण्यात आले. त्यात अग्निवीरांना चार वर्षांच्या लष्करी सेवेनंतर काय लाभ मिळतील याची माहिती देण्यात आली.यात एखाद्यास व्यवसाय करायचा असल्यास त्यास वित्तीय सहाय्य, बॅंक कर्ज दिले जाईल, शिक्षणासाठी सहकार्य केले जाईल, ज्यांना नौकरी करायची आहे त्यांना केंद्रीय सशस्त्र पोलीस दलामध्ये



प्राधान्य दिले जाईल. अशाप्रकारची आश्वासने या पत्रात देण्यात आली आहेत. अग्निपथ ही अग्निवीरांसाठी घोषित केलेली कंत्राट पध्दतीनची सैन्य भरती आहे. त्यामुळे अग्निपथ भरतीचा कालावधी 4 वर्षांऐवजी कमीत कमी 10 वर्षांचा असायला हवा. कारण 10 वर्षांच्या कालावधीतील अनुभव, देशसेवा आणि मुख्यत्वेकरून परिवाराला सुध्दा मुलांच्या नौकरीचा गर्व राहिल यापध्दतीने योजना असायला हवी. त्याचप्रमाणे 6 महिन्यांच्या ट्रेनिंगने तो युवक खरोखरच देशाच्या सिमेवर जाण्यास परीपक्व होईल का? असे अनेक प्रश्न युवकांच्या मनात भेडसावत आहे. त्याचप्रमाणे भरतीची वयोमर्यादा 17.5 ते 21 वर्षे ठेवली एवढ्या कमी वयात खरोखरच मुलगा सिमेवर जाईल का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. वयोमर्यादेचा प्रश्न आंदोलकांनी उपस्थित करताच सरकारने सारवासारव करत वयोमर्यादा 21 वरून 23 वर्षे केली. सरकारची योजना ठीक आहे यात दुमत नाही. परंतु युवकांना चिंता या गोष्टीची आहे की 4 वर्षांनंतर करायचे काय?

विरोधी पक्षांनी अग्निपथ योजनेचा विरोध न करता त्यात नवीन काय करता येईल याकडे सरकारचे लक्ष केंद्रित करायला हवे. कारण हा प्रश्न देशाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा व संवेदनशील आहे. त्यामुळे विरोधक विरोधात आहे म्हणून विरोध करायचा असे होवू नये. सरकारने व विरोधी पक्षाने आंदोलकांशी सवीस्तर चर्चा करावी व योग्य तोडगा काढुन उचीत निर्णय घ्यावा. नौदल प्रमुख ॲडमिरल आर. हरी कुमार यांनी म्हटले की या योजनेवर इतका व्यापक हिंसा अपेक्षित नव्हती. म्हणजेच हिंसेची चिंता उच्च पदस्थ अधिकाऱ्यांसोबत संपूर्ण देशाला आहे. कारण रेल्वे जाळपोळ, सार्वजनिक स्थानकावरील नुकसान म्हणजे देशाचेच नुकसान ही बाब आंदोलकांनी लक्षात ठेवली पाहिजे. त्यामुळे अग्निपथ योजनेतील अग्निवीरांसाठी गांभीर्याने विचार करून सर्वांच्या अडचणी दूर करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे युवकांनी राजकारणाला बळी न पडता सरकारशी संवाद साधावा यात समाधान अवश्य निघेल याची मला खात्री आहे.

# नारी शक्तीचा सन्मान

आधुनिक केसरी

भारताचे महामहिम राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपत आल्याने निवडणूक आयोगाने राष्ट्रपती निवडणुकीची घोषणा केली. निवडणूक घोषित झाल्यानंतर सत्ताधारी भाजपप्रणित एनडीए आणि विरोधी पक्षप्राणित युपीए या दोन्ही गटात हालचाली सुरू झाल्या असून सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही आपापला उमेदवार घोषित केले आहे. राष्ट्रपती पदासाठी विरोधकांकडून एकेकाळी भाजपचे नेते असलेले आणि माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात मंत्री असलेले पण आता भाजपपासून दूर गेलेले यशवंत सिन्हा यांना उमेदवारी दिली आहे. वास्तविक ही निवडणूक जिंकून देतील इतके मतदार यूपीएकडे नाही त्यामुळे यूपीए कडून उमेदवारी करायला कोणीही तयार नव्हते. सुरवातीला राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना गळ घालण्यात आली मात्र त्यांनी नकार दिल्यावर फारुख अब्दुल्ला यांना विनंती करण्यात आली त्यांनीही नकार दिल्याने गोपालकृष्ण गांधी हे यूपीएचे उमेदवार असतील अशी अटकळ बांधली गेली मात्र ऐनवेळी यशवंत सिन्हा यांचे नाव ऐनवेळी पुढे आले आणि त्यांना उमेदवारी मिळाली. यूपीएपेक्षा भाजपप्रणीत एनडीए कडून कोणाला उमेदवारी मिळते याची लोकांना जास्त उत्सुकता होती कारण भाजपने दिलेला उमेदवारच भारताचे नवे राष्ट्रपती होतील. भाजपने नेहमीप्रमाणे शेवटपर्यंत आपला उमेदवार कोण हा सस्पेन्स कायम ठेवून ऐनवेळी ओरिसाच्या आदिवासी समाजाच्या नेत्या द्रौपदी मुर्मु यांची उमेदवारी घोषित केली. द्रौपदी मुर्मु या ओरिसामधील भाजपच्या नेत्या असून झरखंडच्या माजी राज्यपाल आहेत. राजकारणात येण्यापूर्वी त्या शिक्षिका होत्या. द्रौपदी मुर्मु यांना उमेदवारी देऊन भाजपने आपला विजय निश्चित केला असल्याचे मानले जाते कारण राष्ट्रपतीपदासाठी आपला उमेदवार सहज जिंकून आणण्याइतके बहुमत भाजपकडे नाही त्यामुळे त्यांना नवीन पटनाईक, झारखंड मुक्तीमोर्चाचे हेमंत सोरेन, वायआरएस कॉँग्रेसचे जगनमोहन रेड्डी यंची गरज भासणार आहे. द्रौपदी मुर्मु या ओरिसाच्या मूलनिवासी आहेत त्यांना उमेदवारी मिळाल्याने नवीन पटनाईक यांच्या बिजू जनता दलाच्या आमदार खासदारांची मते द्रौपदी मुर्मु यांना मिळणार आहे. द्रौपदी मुर्मु या आदिवासी समाजाच्या असल्याने हेमंत सोरेन यांचापक्षही त्यांना मतदान करण्याची शक्यता आहे त्यामुळे द्रौपदी मुर्मु यांचा विजय निश्चित झाला आहे. द्रौपदी मुर्मु या राष्ट्रपती बनल्यास त्या भारताच्या दुसऱ्या महिला आणि पहिल्या आदिवासी राष्ट्रपती असतील. भाजपने द्रौपदी मुर्मु यांना उमेदवारी देऊन महिला शक्तीचा आणि समरसतेचा सन्मान केला आहे. देशाच्या अमृत महोत्सवी वर्षात एक शिक्षिका असलेल्या आदिवासी समाजाच्या कर्तृत्वान महिला देशाच्या सर्वोच्च पदावर बसणार आहेत याचा देशातील १३६ कोटी जनतेला अभिमान आहे. द्रौपदी मुर्मु यांना मिळालेला हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून देशातील समस्त महिला वर्गाचा आहे. राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांचा पुरस्कार द्रौपदी मुर्मु यांच्या उमेदवारीमुळे झाला आहे. सावित्रीची लेक असलेल्या भारताच्या भावी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांचे मनापासून अभिनंदन!



**-श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

# राजकीय पुढाऱ्यांचे सत्तेसाठी बंड पुकारणे आम जनतेसाठी व राज्याच्या विकासासाठी घातक



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**राजकारणात सत्तेसाठी होत असलेली ढवळाढवळ ही लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी या पदाला धोकादायक असल्याचे दिसून येते.जनप्रतिनिधी किंवा लोकप्रतिनिधी यांना जर पक्ष सोडायचा असेल सर्वप्रथम आमदारकीचा किंवा खासदारकीचा राजीनामा पक्षप्रमुख, राज्यपाल किंवा राष्ट्रपती यांना द्यायला हवा. नंतर बंड पुकारून काय करायचे ते करायला हवे. कारण लोकांनी जनतेची सेवा करण्यासाठी विधानसभेवर पाठविलेले असते. सत्तेचा उपभोग घेण्यासाठी नाही. सत्तेसाठी आमदारांना किडन्याप करणे, दुसऱ्या राज्यात पळवून नेले ही बाब जनप्रतिनिधी या पदाला शोभा देत नाही.**

सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रात सत्तेसाठी प्रत्येक पक्ष कोणत्याही स्तरावर जायला तयार असल्याचे दिसून येते. पक्ष निष्ठा, सामाजिक बांधिलकी, जनकल्याण, समाजसेवा, जनसेवा या गोष्टी बाजूला सारून सत्ता कशी काबीज करता येईल याकडे राजकीय पुढाऱ्यांचे जास्त लक्ष असल्याचे दिसून येते. हे आपण देशातील अनेक राज्यांत पाहिले आहे. परंतु महाराष्ट्रात गेल्या अडीच वर्षांपासून सत्तेसाठी हायहोल्टेज ड्रामा कोणत्या ना कोणत्या कारणाने पहायला मिळतो. यामुळे आमजनतेची दिशाभूल होतांना दिसते. आम जनतेची एकच इच्छा असते की राज्याचा कारभार सुरळीत चालावा व राज्याच्या जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण व्हाव्यात हे राज्याच्या 12 कोटी 94 लाख लोकांचे विचार असते. परंतु राजकीय पुढाऱ्यांचे विचार यांच्या विपरीत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात भाजप व शिवसेना युतीमध्ये विधानसभा निवडणुका लढल्या यात भाजपचे जास्त आमदार निवडून आले व शिवसेनेचे कमी आले. ज्यापक्षाचे जास्त आमदार त्याचाच मुख्यमंत्री होणार असे भाजपचे म्हणने होते तर शिवसेनेचे म्हणने होते की अडीच-अडीच वर्षांचा मुख्यमंत्री. यामुळे दोन्ही पक्षांत एकमेकांत कटुता निर्माण झाली. यानंतर सत्तेसाठी अजित पवारांनी भाजपाशी हात मिळवली केली व पहाटे राज्यपालांच्या उपस्थितीत देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. त्यावेळेस सूध्दा हायहोल्टेज ड्रामा मोठ्या प्रमाणात दिसून आला व अजित पवारांनी भाजपचा साथ सोडला व देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न भंगले.

यानंतर पर्याय म्हणून शिवसेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस याची महाविकास आघाडी सरकार स्थापन झाली. यात उध्दव ठाकरे मुख्यमंत्री व अजित पवार उपमुख्यमंत्री म्हणून पदावर विराजमान झाले. परंतु आज अडीच वर्षांनंतर सूध्दा आपल्याला फक्त सत्तेसाठी हायहोल्टेज ड्रामा होतांना दिसत आहे. आमजनतेला कोणता आमदार कोणत्या पक्षाचा आहे यांच्याशी काहीच देणेघेणे नाही. फक्त राज्याचा कारभार



सुरळीत चालावा व विकास व्हावा हीच सर्वांची इच्छा असते. उध्दव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यापासून शिंदेंच्या पोटात दुखायला लागले व सत्तेसाठीच गेल्या अडीच वर्षांपासून एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्री पदासाठी कुजबुज सुरु होती. त्यासाठीच त्यांनी शिवसेनेत बंड पुकारल्याचे दिसून येते. यापुर्वी 1991 मध्ये छगन भुजबळ यांनी सत्तेसाठी शिवसेनेच्या विरूद्ध बंड पुकारले होते. 2005 मध्ये सत्तेसाठी नारायण राणे यांनी शिवसेनेच्या विरूद्ध बंड पुकारले होते.

आज नायराण राणे सांगतात की ही शिवसेना बाळासाहेब ठाकरेंची रहाली नाही. मग नारायण राणेनी बाळासाहेब ठाकरे असताना शिवसेना का सोडली? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. यावरूनच स्पष्ट होते की सत्तेसाठी राजकीय पुढारी कोणत्याही स्तरावर जायला तयार असतात. सध्याच्या घडामोडी वरून स्पष्ट दिसुन येते की आजचा जो राजकीय हायहोल्टेज ड्रामा दिसत आहे त्याचे मुख्य कारण सत्ताच आहे असे म्हणावे लागेल. प्रत्येक पक्ष सत्तेसाठी काहीही करायला तयार असतो हे महाराष्ट्रातील राजकारणावरून दिसून येते. भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी कमी आमदार असलेले पक्ष (शिवसेना, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस) यांनी आघाडी सरकार स्थापन केली. अधुन-मधुन यांच्यात बिघाडी यायची. परंतु अडीच वर्षांनंतर मोठी बिघाडी आली व आघाडी सरकारमध्ये मोठा भुकंप आला आणि एकनाथ शिंदेंनी पक्षाविरुद्ध बंड पुकारले. यावरून स्पष्ट होते की राजकीय पुढाऱ्यांना लोकप्रतिनिधी किंवा जनप्रतिनिधी या पदाला कलंकित केल्याचे दिसून येते. आज राजकीय पुढाऱ्यांना जनतेच्या ज्वलंत समस्या किंवा प्रश्नाला महत्त्व नसुन सत्तेचा मोह जास्त असल्याचे दिसून येते. अग्निपथ योजनेमध्ये अग्निवीरांना सरकार पेंशन द्यायला तयार नाही ही बाब मान्य आहे. परंतु पाच वर्षे सत्ता भोगणाऱ्या आमदार किंवा खासदार यांना पेंशन का द्यावी? याचा विचार सरकार का करीत नाही? त्याच धरतीवर राजकीय पुढारी स्वतः म्हणणार नाही की आम्हालाही पेंशन नको. कारण 135 कोटी जनतेच्या तुलनेत राजकीय पुढारी सर्वात जास्त गरीब असल्याचे दिसून येते असे मला वाटते. ही स्वतंत्र भारताची शोकांतिका आहे.

आज राजकीय पुढाऱ्यांना सत्तेच्या लोभाने आंधळे केल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांच्यासाठी सत्ता, पैसा, संपत्तीचा मोह अत्यंत महत्त्वाचा असल्याचे दिसून येते. याचे प्रायश्चित्त महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या इत्यादीच्या रूपात जनतेला भोगाव्या लागते. त्यामुळे महाराष्ट्रात जे काही राजकीय वादळ निर्माण झालेल आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे फक्त सत्ता. राजकीय पक्षांच्या दृष्टीकोनातून पक्षप्रमुख महत्वाचा असतो. पक्ष प्रमुखांना जर महत्व नसेल तर राजकीय पक्षांना काहीच महत्त्व नाही. राजकीय पक्षांसाठी कुठेतरी कायद्याचे बंधन असायला हवे. ज्यांना कोणाला पक्ष सोडायचा आहे. त्यांचे आमदारकीचे राजीनामे राज्यपाल व पक्ष प्रमुख यांच्याकडे जायला हवे किंवा पक्ष सोडल्यानंतर आपोआप आमदारकीचे पद रीक्त व्हायला हवे. कारण जो कोणी आमदार कोणत्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक येतो तेव्हा तो पक्षप्रमुख व पक्षाचा बांधील असतो व असायला पाहिजे. आता असे झाले आहे की "आवबे लड्डू जावबे लड्डू" यामुळे जिधर दम उदर हम अशी परिस्थिती दिसून येते. सत्तेसाठी कोणीही केव्हाही सरकारला धोका देवु शकतो. सरकारला धोका म्हणजे जनतेला खुला धोका. राजकीय पुढाऱ्यांवर (आमदारांवर) कोणतेही बंधन नसल्यामुळे ते केव्हाही आपल्या पक्षाच्या विरूद्ध बंड पुकारू शकतात ही बाब लोकशाहीला घातक आहे.

लोक ज्या आमदारांना 5 वर्षांसाठी निवडणूक देतात त्यामागे पक्ष, त्या व्यक्तीच कर्तृत्व, पक्षाची प्रतीष्ठा इत्यादी गोष्टींचा विचार करून आमजनता आमदारांना निवडणूक देतात. त्याचप्रमाणे आमजनतेचे आमदारांना मिळणारे 80 टक्के मतदान पक्षांला धरून असते व 20 टक्के मतदान त्या व्यक्तीच्या स्वबळाचे असते. म्हणजेच आमजनता पक्षाला निरखून मतदान करीत असते. म्हणेच आमजनतेची जास्त पसंत ही पक्षाला धरून असते. त्यामुळे पक्ष सोडने, सत्तेत ढवळाढवळ करने, सत्तापरीवर्तन करने म्हणजे आमदारांची मनमानीच म्हणावी लागेल. यात आमजनतेचे मोठे नुकसान होते व राज्याचा करोडो रूपयांचा चुराडा होतो. यावर सरकारने ताबडतोब नवीन कायदा करण्याची गरज आहे. कारण राजकीय पुढाऱ्यांनी सत्ता परिवर्तनासाठी राजकीय आखाड्यात न उतरता सरळ जनतेच्या आखाड्यात उतरण्याची गरज आहे. तेव्हाच त्याला खरा जनप्रतिनिधी किंवा लोकप्रतिनिधी म्हणता येईल.

# सरकारी नोकऱ्यांचे प्रमाण घटत जाणार

आधुनिक केसरी

**केंद्र आणि राज्य सरकारमधल्या तसेच सरकारी उपक्रमांमधल्या नोकऱ्यांचे प्रमाण उत्तरोत्तर घटतच जाणार आहे. भारतात पदवीधरांमधल्या बेरोजगारीचा दर १७ टक्के आहे तर पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्यांमधला बेरोजगारी दर १४.६ टक्के आहे. देशातल्या सहा कोटी ३० लाख पदवीधरांपैकी जवळपास एक कोटी पदवीधर हे कामाच्या शोधात फिरत असल्याचे सीएमआयईची आकडेवारी सांगते. बेरोजगारीचा धसका जगभर घेतला जात आहे. कोरोना संक्रमणाच्या दुर्दैवी पर्वानंतर जणू सर्वच क्षेत्रांमध्ये नोकऱ्यांना कात्री लागली. भारतातच नव्हे तर जगभरात अनेक ठिकाणी हा विषय गंभीर बनला आहे. रोजगारसंधींमध्ये सतत पडझड होतच असते. मात्र, गेल्या काही काळात सर्वत्र कर्मचाऱ्यांच्या संख्येमध्ये काटछाट होत आहे. अनेकांच्या नोकऱ्या अनपेक्षितपणे जात आहेत. खाजगीच नाही, तर सरकारी क्षेत्रातही हे अनुभवायला मिळत आहे. सहाजिकच यासंदर्भात अनेक ठिकाणी अविश्वासाचे, निराशेचे वातावरण आहे.**

आजघडीला देश कोरोनाच्या विळख्यातून बाहेर पडत असताना एकूणच सामाजिक हिताच्या दृष्टीने लोकांच्या आर्थिक क्षमतेचा विचार होणं आवश्यक आहे. त्यासाठी सर्वांना नोकरी, सर्वांना स्थायी रोजगार आणि आर्थिक उन्नतीच्या माध्यमातून जीवनस्तर उंचावण्याची संधी मिळणं आवश्यक आहे. त्या दृष्टीने राज्यकर्ते आणि प्रशासनाचे जोरकस प्रयत्न होण्याची गरज आहे. प्रत्यक्षात मात्र वेगळंच चित्र पहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात नोकरकपात आणि रोजगारांची घटती संख्या पहायला मिळत आहे. अचानक कामावरुन काढून टाकलं जाण्याची उदाहरणंही वाढली आहेत. कोरोनाचा विळखा सैल होत जाईल तसतसे नोकऱ्यांसाठी जादा हात पुढे येणार आहेत. या परिस्थितीला सामोरं जाण्याची तयारी होणं, या विषयाकडे एकूणच सर्व सरकारांनी साकल्याने बघणं आवश्यक आहे. त्या दृष्टीने पाहता आसपासची अनेक उदाहरणं बोलकी ठरत आहेत. नोकरकपातीची परिस्थिती उग्र रुप धारण करत असून या अनुषंगाने पावलं उचलण्याची गरज जाणवत आहे.

न्यूयॉर्कमधल्या शाळकरी विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाच्या सुविधेसाठी पंधरा कोटी रुपयांची मदत केल्याने प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या 'बेटर डॉट कॉम' कंपनीचे संस्थापक आणि सीईओ विशाल गर्ग यांनी अलिकडे झूम कॉलवर सुरु असलेल्या बैठकीतच ९०० लोकांना तडकाफडकी कामावरून काढून टाकलं. एकीकडे गोरगरीब मुलांसाठी टॅब, इंटरनेट, पुस्तकं, गणवेश यासाठी निधी देणाऱ्या विशाल यांनीच 'तुम्ही या कॉलमध्ये असाल तर तुम्ही या दुर्दैवी ग्रुपचा एक भाग आहात. तुम्हा सर्वांना कामावरून कमी केलं जात आहे', अशी घोषणा करून टाकली. संपूर्ण जग कोरोनाच्या नवनवीन व्हेरियंट्सशी मुकाबला करत असतानाच कंपन्या या प्रकारे लोकांना कामावरून काढून टाकत असतील तर सामान्यजनांनी काय करायचं, असा प्रश्न निर्माण होतो. हे कर्मचारी त्यांच्या कामाबाबत फारसे गंभीर नव्हते. अकार्यक्षमतेमुळे कंपनीचे ग्राहक कमी होऊन इतर कंपन्यांकडे वळले, तसंच केवळ दोन तास काम करून आठ तास काम केल्याचा आव हे कर्मचारी आणत होते, असे आरोप करण्यात आले आहेत. वास्तविक, नोकरीत घेताना लेखी व तोंडी मुलाखती घेऊन, नीट पारखून निवड केली जाते. त्याचप्रमाणे काढून टाकताना रीतसर नोटीस देणं हे कायद्याला धरून आहे. तसंच या कर्मचाऱ्यांचं काम असमाधानकारक होतं, तर त्यांना आपल्या कामात सुधारणा करण्याची संधी देण्यात आली होता का? वरिष्ठांकडून 'परफॉर्मन्स अप्रैजल'च्या वेळी काही सूचना करण्यात आल्या होत्या का असे प्रश्न उपस्थित होतात.

कोरोनामुळे आलेल्या मंदीतून अमेरिकन अर्थव्यवस्था बाहेर येत चालली असली तरीदेखील बेरोजगारांसाठीच्या लाभांसाठी अर्ज करणाऱ्या अमेरिकनांची संख्या वाढलीच आहे. तिथे नोव्हेंबर २०२१ अखेर एक लाख ९४ हजार व्यक्तींनी या लाभांसाठी अर्ज केला होता. त्यानंतरच्या आठवड्याभरात ही संख्या २८ लाखांनी वाढली आहे. जानेवारी २०२१ मध्ये हा आकडा नऊ लाख इतका ङ्गुगला होता. सहा महिने किंवा त्यापेक्षा जास्त काळ बेकार असणाऱ्यांना अमेरिकेत बेरोजगार विमा कार्यक्रमांतर्गत मदत केली जाते. अशांना दर आठवड्याला तीनशे डॉलर्स दिले जातात. जून २०२० मध्ये एकूण तीन कोटी तीस लाख लोकांना अमेरिकेत बेरोजगार भत्ता दिला जात होता. या पार्श्वभूमीवर भारतातली स्थिती काय आहे, याचा एक आढावा घ्यायला हरकत नाही. ऑक्टोबर २०२१ मध्ये भारतात पांढरपेशांना मिळणाऱ्या नोकऱ्यांची संख्या वीस महिन्यांमध्ये सर्वाधिक होती. याचं कारण, देशातली टाळेबंदी जवळपास उठली होती आणि व्यापार, उद्योग, वाहतूक यावरील निर्बंध जवळपास समाप्त करण्यात आले होते. शिवाय सणासुदीचा काळ असल्यामुळे उपभोग्य वस्तूंची मागणी वाढली आणि जीएसटीचं करसंकलनही वाढू लागलं. ऑक्टोबरमध्ये 'एक्सफेनो' या स्पेशलिस्ट स्टाफिंग फर्मने लिंक्डइनच्या सहकार्याने तयार केलेल्या अहवालानुसार, ऑक्टोबर २०२१ मध्ये ३ लाख २० हजारजणांना रोजगार मिळाला तर नोव्हेंबरमध्ये हा आकडा २ लाख ९५ हजारवर आला. कदाचित युरोप व अमेरिकेत कोव्हिडच्या केसेस पुन्हा वाढू




लागल्या आणि त्याचा परिणाम भारतीय बाजारपेठेवर होईल, असं वाटल्यामुळे नव्याने नोकरभरतीचा वेग मंदावला असावा. आता ओमिक्रॉनचा ङ्गैलाव होत असला तरी सेवाक्षेत्रात अधिक रोजगार मिळण्याची शक्यता आहे. याचं कारण, हे क्षेत्र अधिकाधिक खुलं होऊ लागलं आहे. कॉर्पोरेट क्षेत्रातल्या नव्या नोकऱ्यांमध्ये सर्वाधिक वाटा हा टेक्नॉलॉजी क्षेत्राचा आहे. याचं कारण, कंपन्यांना अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करून इनोव्हेशनकडे वळावं लागत आहे.

डिजिटल कार्यप्रणालीद्वारे उत्पादनखर्चात कपात करण्याकडे आणि स्पर्धाशीलता वाढवण्याकडे सर्वांचा कल आहे. या दृष्टीने अधिकाधिक उच्चशिक्षित तंत्रज्ञांना नोकरीवर घेतलं जात आहे. विविध क्षेत्रांमध्ये हुशार आणि कार्यकुशल तंत्रज्ञांची कमतरता आहे. म्हणजेच एकीकडे बेरोजगारी वाढत आहे आणि दुसरीकडे तंत्रकुशल कर्मचाऱ्यांची टंचाईदेखील आहे. त्यात कोरोनामुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या, हे तर स्पष्टच आहे. उदाहरणार्थ, गेल्या जूनमध्ये 'बुक माय शो' या चित्रपट तिकिटांच्या विक्रीमध्ये महत्वाची भूमिका बजावणाऱ्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मने दोनशेजणांना नोकरीवरून काढून टाकलं. त्यापूर्वी मे २०२० मध्येही या कंपनीने २७० लोकांना घरी पाठवलं होतं. चित्रपटगृहं बंद असल्याचा फटका या कंपनीला बसला. टाळेबंदीमुळे उबर, स्विगी, झोमॅटो, ओला या कंपन्यांनीही लोकांना मोठ्या प्रमाणात काढून टाकलं होते. उदाहरणार्थ ओलाने १४०० लोकांना तर शेअरचॅटने १०१ जणांना दरवाजा दाखवला होता. गेल्या मे महिन्यात झोमॅटोने तेरा टक्के कर्मचाऱ्यांना बाहेरचा दरवाजा दाखवला आणि प्रत्येकाच्या पगारातही ५० टक्क्यांची कपात केली. मात्र कोरोनापूर्व काळात म्हणजे २०१९ मध्ये सरकारी क्षेत्रातल्या कंपन्यांनी ९११ जणांना तर खासगी क्षेत्रातल्या कंपन्यांनी २२८४ लोकांना काढून टाकल्याची माहिती तत्कालीन केंद्रीय कामगार राज्यमंत्री संतोषकुमार गंगवार यांनी राज्यसभेत दिली होती. २०१६, २०१७ आणि २०१८ या तीन वर्षांमध्ये अनुक्रमे ४२००, ६४४९ आणि ३६८८ जणांना ले ऑफ देण्यात आला. विशेष म्हणजे एकाच कंपनीतून काढून टाकण्याचे सरासरी प्रमाण हे खासगीपेक्षा सरकारी क्षेत्रात जास्त असल्याचं सरकारच्याच आकडेवारीतून स्पष्टपणे दिसून आलं. याचा सरळ अर्थ असा की भविष्यकाळात खासगी क्षेत्रातच नवीन नोकऱ्या अधिक प्रमाणात निर्माण होणार आहेत किंवा होऊ शकतात. खासगीकरणाच्या सर्वव्यापी धोरणामुळे सार्वजनिक क्षेत्र आकुंचन पावणार आहे. आरक्षणाच्या धोरणांचा पुरस्कार करतानादेखील हे भान ठेवावं लागणार आहे. केंद्र आणि राज्य सरकारमधल्या तसंच सरकारी उपक्रमांमधल्या नोकऱ्यांचे प्रमाण उत्तरोत्तर घटतच जाणार आहे. भारतात पदवीधरांमधल्या बेरोजगारीचा दर १७ टक्के आहे तर पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्यांमधला बेरोजगारी दर १४.६ टक्के आहे.

देशातल्या सहा कोटी ३० लाख पदवीधरांपैकी जवळपास एक कोटी पदवीधर हे कामाच्या शोधात फिरत असल्याचे सीएमआयईची आकडेवारी सांगते. एकंदरीत, भारतातल्या बेरोजगारीच्या समस्येची व्याप्ती आणि गुंतागुंत लक्षात घेऊन त्यानुसार धोरणे ठरवण्याची आवश्यकता आहे.

# नारवट शाळेत केली शिक्षकाची नियुक्ती

## विद्यार्थी व पालकात समाधान; विद्यार्थी गिरवतात धडे

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भोकर -नांदेड रस्त्यावर अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या नारवट (ता. भोकर) येथील शाळेवर दोन शिक्षकांच्या "उचापती" सुरू झाल्याने त्यांना त्वरित हटवण्यात आले.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने बातमीचा पाठलाग करताच मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राथमिक शिक्षण अधिकाऱ्यांनी गुरुवारी (ता.२३) एका शिक्षकाची नियुक्ती केली आहे. शैक्षणिक क्षेत्र सुरळीत झाल्याने विद्यार्थी व पालकात समाधान व्यक्त केले जात आहे.

नारवट (ता.भोकर) शाळेत इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत शाळा असून मुख्याध्यापक व दोन शिक्षक कार्यान्वित आहेत. दोन वर्षांपासून करोनामुळे "घंटा" वाजलीच नाही. यंदा शैक्षणिक वर्ष नव्याने सुरू करण्यात आल्याने बऱ्याच दिवसांनी चिल्यापिल्यांचा किलबिलाट सुरू झाला. नव्यापिढीचे "शिल्पकार" म्हणून समाज शिक्षकांकडे मोठ्या अपेक्षेने पाहतो आहे. काही शिक्षकांनी मात्र अपेक्षाभंग केल्याचे उघडकीस आल्याने शिक्षकांवरील विश्वास उडाला आहे. असाच काहीसा प्रकार नारवट शाळेत घडल्याने ग्रामस्थांनी शिक्षकाविरूध्द "दंड" थोपटले आहे. याची दखल घेऊन गटशिक्षणाधिकाऱ्यांनी "त्या" कामचुकार दोन शिक्षकांना तात्काळ तालुका गटसाधन केंद्रात हलवल्याने शिक्षकाविनाच शाळा सुरू होती. पालक आणि विद्यार्थी संभ्रम अवस्थेत होते. सदरील बातमीचा "पाठलाग" सुरू केल्याने मुख्यकार्यकारी अधिकारी, प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांनी बातमीची दखल घेऊन शिक्षक देण्यासाठी हालचाल सुरू केली. शिक्षणाधिकारी सवीता बेरगे यानी दिलेल्या आदेशानुसार गुरूवारी रिठ्ठा (ता.भोकर) येथील शिक्षक सुनील मोरे यांची नियुक्ती नारवट शाळेवर केली आहे.

### शिक्षण झाले सुरळीत

**येथील शाळेवर मुख्याध्यापक आणि एका विषयतज्ञ शिक्षकावर जबाबदारी देण्यात आली होती. आता नव्याने एका शिक्षकाची नियुक्ती करण्यात आल्याने तीन शिक्षक झाले आहेत. शैक्षणिकबाबी सुरळीत होईपर्यंत विषय तज्ञ शिक्षक सुधांशू कांबळे यांना थांबण्याचे आदेश देण्यात आल्याचे समजते. तालुक्यातील इतर शाळेवर असा प्रकार होऊ नये म्हणून वादग्रस्त शिक्षकावर कठोर कार्यवाही करणे गरजेचे आहे. शिक्षणविभागाच्या निर्णयाकडे आता सर्वांचे लक्ष लागून आहे.**



# कारसह गावठी पिस्टल व जिवंत काडतुसासह एकाला अटक

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** पोलिसांना गुप्त बातमीदारांकडून माहिती मिळाली की एक सिल्व्हर रंगाची आय-२० कार चिंचोलीकडून नागदकडे जोराने जात असून तिच्यात एक महिला व एक पुरुष असुन त्यांच्याकडे गावठी बनावटीचे पिस्टल आहे, अशी माहिती मिळाली. पिशोर पोलीस ठाण्याच्या सपोनि कोमल शिंदे यांनी फौजफाटा घेऊन मौजे सावरगाव फाटा येथे नाकाबंदी करून या कारला रोखण्यास यश मिळविले.

याबाब अधिक माहिती अशी की, ह्युडाई आय-२० ची कार क्र. एमएच.२० बी.एन. ६०४४ ही अडवून त्यात बसलेला विनोद सरदार परदेशी वय ३५ वर्ष रा.जामडी ता. चाळीसगाव जि.जळगाव याची अंगझडती घेतली असता त्याचेजवळ एक स्टिलची गावठी पिस्टल व पाच जिवंत काडतुस (बुलेट) मिळुन आल्याने पोलीसांनी पंचनामा करुन कार, पिस्टल, जीवंत काडतुस व एक मोबाईल असा एकुण २,५५,००० रुपयेचा मुद्देमाल जप्त केली असून पोलीस नाईक सोपान डकले यांनी फिर्याद दिल्याने नमुद आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे पिशोर येथे सपोनि कोमल शिंदे यांनी गुन्हा नोंद केला आहे.

सदरच्या गुन्ह्यात विनोद परदेशी यास अटक करण्यात आली असून त्याचे सोबत कारमध्ये असलेली त्याची प्रियसी हीचा पण गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने तीला देखील अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सतीश बडे करत आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मनिष कालवानिया, अपर पोलीस अधीक्षक पवन बनसोड, उपविभागीय पोलीस अधिकारी मुकंद आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि कोमल शिंदे, सोपान डकले, किरण गंडे, लालचंद नागलोद, संदीप चव्हाण, दीपक सोनवणे, अन्सार पटेल, करण म्हस्के, साईनात घुगे, कौतीक सपकाळ यांनी केली आहे.

# बाबरा येथे कृषीदूतांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज




**फुलंब्री :** ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम 2022-23 कार्यक्रमा अंतर्गत कृषी महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी सध्या विद्यापीठाने नेमून दिलेल्या गावात असल्याने तेथेच त्यांना प्रात्यक्षिक करण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत डॉ.गंगाधरराव पाथ्रीकर कृषी महाविद्यालय पाथ्री ता.फुलंब्री या महाविद्यालयाचे विद्यार्थी कृषीदूत पाटील हृषीकेश, मोरे शुभम, निरफल विशाल, नागरे रोहित, नलावडे गजानन व पवन कुमार यांनी बाबरा येथे 'माती परीक्षण' या विषयावर शेतकऱ्यांना माहिती दिली व प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवले.

रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत कमी होत आहे. त्यामुळे योग्य प्रमाणात खतांची मात्रा तसेच जमिनीतील उपलब्ध असणाऱ्या पोषक घटकांची माहिती आपल्याला माती परीक्षण केल्याने समजते त्यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होते असे मत यावेळी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी उपस्थित शेतकऱ्यांच्या शंका, प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिली. फळबाग लागवडीचा आराखडा व नियोजन कसे करावे याविषयी माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांना रासायनिक आणि जैविक पद्धतीने बीज प्रक्रिया करून प्रात्यक्षिक करून दाखवले, बीज प्रक्रिया केल्याने पिकांची उगवण क्षमता वाढते. तसेच वृक्षारोपणासाठी योग्य पद्धतीने खड्डा घेऊन वृक्षारोपण केले. यावेळी बाबरा गावचे सरपंच वालंबाबाई पवार, उपसरपंच रामकृष्ण मैंद तसेच गावातील शेतकरी उपस्थित होते.

कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नागरगोजे, कार्यक्रम अधिकारी डॉ. अतुल मुराई, कार्यक्रम समन्वयक प्रा. वाहेकर, डॉ. व्ही. पी. वावधने, प्रा.डॉ.मोरे, प्रा.जी.एस. साबळे, प्रा.व्ही.बी.घुले, प्रा.डी.वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी वेगवेगळे उपक्रम राबविले आहेत.



# माणेगाव ते दादुलगाव रोडलगत असलेली काटेरी झाडे काढण्यास झाली सुरुवात

## उशीरा का होईना पी.एम.जी.एस.वायच्या बुलढाणा विभागाला आली जाग

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** माणेगाव ते दादुलगाव हा तसा नेहमीचा रहदारीचा रस्ता मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ या रोडने असते. मांडवा, आडोळ, तीवडी, गौलखेड, दादुलगाव, हिंगणा ही गावे या रोडवर असल्याने जळगाव जामोद आणि नांदुऱ्याला जाण्यासाठी त्यांना याच रोडने जावे लागते. पण गेली कित्येक महिने झाले. या रोडच्या दोन्ही बाजूस मोठमोठी काटेरी झूडपे वाढलेली होती. त्यामुळे रोडने प्रवास करताना बऱ्याच ठिकाणी जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागत होता. दोन वाहनेही बऱ्याच ठिकाणी एकमेकांना क्रॉंस करू शकत नव्हती. ऐवढी गंभीर परिस्थिती या रोडची होती. छोटे मोठे अपघात तर नेहमीच या रोडणे होत होते. अक्षरशः हा रस्ता अपघातालाच निमंत्रण देत होता.

दादुलगाव, गौलखेड, हिंगणा या गावच्या सरपंचांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, आधुनिक केसरीचे जिल्हा प्रतिनिधी सागर झनके यांनी वारंवार PMGY विभागाच्या अधीकाऱ्यांकडे तक्रार केल्या. पत्रकार बांधवांनी तर संबंधित विभागाला धारेवर धरत तशा बातम्या प्रसारित केल्या तेव्हा कुठ संबंधित विभागाल जाग येवून उशीरा का होईना अगदी पावसाळ्याच्या तोडावर सदर रोडच्या दोन्ही बाजूस असलेली काटेरी झुडपे ठेकेदाराकडून काढण्याचे काम सुरु केले. सदर रस्ता हा प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून झाला असून संबधीत ठेकेदाराकडे रस्ता देखभाल दुरूस्तीचे काम आहे.

प्रसार माध्यमांनी सदर रोडची बातमी लावून धरली होती. त्यामुळे संबंधीत यंत्रणेला जाग आली हे विशेष. अखेर आज 23 जूनपासून रोड लगत असलेली काटेरी झुडपे काढण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे परिसरातील सर्वच गावातील ग्रामस्थांसह रोडणे प्रवास करणाऱ्या प्रवाशामध्ये आनंदाचे वातावरणात पहावयास मिळत आहे

# ४२ वर्षीय इसमाने केली आत्महत्या

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या सात जणांवर गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** साक्रीतील कुंभार गल्लीत राहणाऱ्या योगेश पंडीत रामोळे या ४२ वर्षीय इसमाने आत्महत्या केली. त्याला सतत त्रास देवून आत्महत्येस प्रवृत्त केल्याची तक्रार मयताच्या वडिलांनी पोलिसात दिल्याने सात जणांवर गुन्हा दाखल झाला. याबाबत पंडीत एकनाथ रामोळे या वृध्दाने दिलेल्या तक्रारीनुसार, गल्लीतील गणेश मोरे यांच्या घराच्या भिंतीचे दुरुस्तीचे काम सुरू करावयाचे असल्याने योगेश पंडीत रामोळे याने त्याला तु तुझे काम करून घे, फक्त माझी भिंत पडायला नको याची काळजी घे, असे सांगितल्याने राग येवून रोहित ऊर्फ पिंटू मोरे, संदीप मोरे, गणेश मोरे यांनी त्याला कामावरून बोलावून घेत मारहाण केली. या मारहाणीत बेशुध्द झालेल्या योगेश उपचार करून घरी परत आला असता धाऱ्या जोहरी, गोपाल जोहरी, कुंदन जोहरी, बापू एकनाथ रामोळे यांनी त्याला घर खाली करण्यासाठी तगादा लावला.

या त्रासाला कंटाळूनच योगेशने दि.२१ जूनच्या रात्री गळफास लावून घेत आत्महत्या केली. योगेशच्या मृत्यूस रोहित मोरेसह सात जण जबाबदार असल्याचे म्हणत त्यांच्या विरोधात फिर्याद देण्यात आल्याने आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोसई बी.बी. नन्हे अधिक तपास करीत आहेत.

पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी
आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला
३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत
पुस्तकांवर 20% सूट

गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
MRP ₹ 430/- Offer Price ₹ 345/-
पाने ५३४

गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
MRP ₹ 470/- Offer Price ₹ 375/-
पाने ५३४

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
MRP ₹ 360/- Offer Price ₹ 280/-
पाने ३६४

श्रीमती छायाताई खेडकर
8888780568

श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712

गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415

दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712

माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# १० वे अंबाजोगाई साहित्य संमेलन १९, २० व २१ ऑगस्टला होणार

## संमेलनाध्यक्ष दासू वैद्य, डॉ. दिलीप घारे उद्‍घाटक तर समारोपाला डॉ. वृषाली किन्हाळकर यांची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाईचे दर दोन वर्षांनी होणारे अंबाजोगाई साहित्य संमेलन यावर्षी ऑगस्ट महिन्याच्या १९, २० व २१ ऑगस्ट रोजी संपन्न होणार आहे. या संमेलनात अनिवासी अंबाजोगाईकर यांचा सहभाग असणार आहे, अशी माहिती स्वागताध्यक्ष प्राचार्य बी.आय. खडकभावी व मसापचे सचिव गोरख शेंद्रे यांनी जाहीर केली आहे.

अंबाजोगाई साहित्य संमेलन हे दर दोन वर्षांनी घेतले जाते. १९९६ साली पाहिले संमेलन घेतले गेले. त्यानंतर नऊ संमेलने आज पर्यंत घेतली गेले आहेत. हे १० वे संमेलन आहे. अंबाजोगाईचे नागरीक अनेक क्षेत्रात महाराष्ट्रात, देशात व परदेशात व्यवसाय, नौकरी, पत्रकारिता, न्याय, नाट्य, ललित कला, संगीत, अभिनय, शिक्षण, विज्ञान, इतिहास, सामाजिक प्रशासन आदी क्षेत्रात नावलौकिक मिळवून आपली प्रगती करत आहेत. अशा सर्वांचा या संमेलनात सहभाग असणार आहे. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. बी.आय. खडकभावी यांची यापूर्वीच निवड करण्यात आली असून त्यासाठी स्वागत समिती स्थापन करण्यात आली आहे. कर्नाटकातून इथे स्थायिक होऊन त्यांनी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था संचलित पोलिटेक्निकल व इंजिनियरिंग क्षेत्रात आपला वेगळा ठसा निर्माण करून महाराष्ट्रात अंबाजोगाईचा नावलौकिक त्यांनी मिळविला आहे.

**संमेलनाचे अध्यक्ष दासू वैद्य**



१० व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अंबाजोगाईचे सुपुत्र सुप्रसिद्ध कवी, नाटककार, गीतकार प्रा. दासू वैद्य यांची यापूर्वीच निवड करण्यात आली असून साहित्य क्षेत्रात वेगळा दबदबा त्यांनी अल्पवधीत केला आहे. अनेक चित्रपटांचे व मराठी मालिकांचे शीर्षक गीते त्यांनी लिहिली. अनेक ख्यातनाम गायकांनी ती गायली आहेत व ती गीते मराठी रसिकांच्या ओठांवर सतत असतात. नाटक, ललित, व पद्य लेखना बरोबर गद्य लेखनही त्यांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे ते प्रमुख असून विद्यापीठ स्थापित आद्यकवी मुकुंदराज अध्यासनाचे ते पहिले संचालक म्हणूनही कार्य करीत आहेत. अ.भा. मराठीत साहित्य संमेलन, मराठवाडा साहित्य संमेलन, साहित्य अकादमीचे बहुभाषिक कविसंमेलन, इतर प्रादेशिक व साहित्य संस्था आयोजित कवी संमेलन व विविध परिसंवाद यात त्यांचा उल्लेखनीय सहभाग राहिला आहे. नाट्यशास्त्रात त्यांनी पदवी मिळवून नाट्य, बालनाट्य लेखन केले आहे. मराठवाड्याचे महत्वाचे लेखक व अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे विद्यमान अध्यक्ष भारत सासणे यांच्या साहित्यावर संशोधनात्मक प्रबंध सादर करून त्यांनी डॉक्टरेट ही पदवी प्राप्त केली असून त्यांना मानाचे प्रतिष्ठीत पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**प्रा. दिलीप घारे उदघाटक तर डॉ. वृषाली किन्हाळकर समारोपाच्या मुख्य अतिथी**

या संमेलनाचे उदघाटन अंबाजोगाईचे भूमिपुत्र ज्येष्ठ नाट्य व सिने कलावंत प्रा. दिलीप घारे यांच्या हस्ते होणार असून घारे यांना अभिनयाचे बाळकडू अंबाजोगाईतच मिळाळे. काळा हनुमान सांस्कृतिक मंडळाच्या मेळातून व अंबाजोगाईतील नाटकातून त्यांनी अभिनयाचे काम केले व अभिनयात प्राविण्य मिळविले. पुढे औरंगाबाद येथे सरस्वती भुवन शिक्षण संस्थेत नाट्य विभाग प्रमुख म्हणून त्यांनी सेवा केली. अनेक चित्रपट, नाटक व नाराठी मालिकेतून त्यांनी कला सादर केली आहे. प्रा. यशवंत देशमुख व प्रा. दिलीप घारे यांचे गाजराची पुंगी हे दोनपात्री नाटक महाराष्ट्रभर गाजले आहे. अशा गुणी कलावंताच्या हस्ते या संमेलनाचे उदघाटन होणार आहे.

या संमेलनाचा समारोप ख्यातनाम कवियत्री डॉ. वृषाली किन्हाळकर यांच्या मुख्य उपस्थितीत होणार आहे. डॉ. किन्हाळकर ह्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाईच्या माजी विद्यार्थिनी असून त्या प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ, कवियत्री, व्याख्यात्या व लेखिका आहेत. स्त्रियांच्या दुःख, वेदना व व्यथा त्यांनी आपल्या लेखनातून मांडल्या आहेत. उस्मानाबाद येथे पार पडलेल्या मराठवाडा लेखिका संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. अनेक पुरस्कार-मानसन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत.

या संमेलनात कवी संमेलन, पत्रकारिता, महिला, ललित कला आदी विषयांवर परिसंवाद आयोजित केले जाणार आहेत. त्याचबरोबर कथाकथन, "माझ्या सवे गंध अंबाजोगाईचा" या विषयावर विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या मुलाखती, मनोगते आयोजित केली जाणार आहेत. संमेलनाचे माजी दिवंगत अध्यक्ष प्राचार्य संतोष मुळावकर शिक्षक साहित्य पुरस्कार, मंदा देशमुख कथा लेखक पुरस्कार व प्राचार्या शैला लोहिया लेखिका पुरस्कार प्रदान केले जातील. त्याचे स्वरूप प्रत्येकी दोन हजार रुपये रोख, शाल, स्मृती चिन्ह व शाल पुष्पहार असे आहे. पुस्तक प्रदर्शने, कला प्रदर्शने, सांस्कृतिक कार्यक्रम याचबरोबर सहभाही रसिकांचा विविध गुण दर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल.

हे संमेलन अनिवासी अंबाजोगाईकर यांच्यासाठी खास असल्याने अंबाजोगाईच्या स्थानिक रसिकांकमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. अनिवासी अंबाजोगाईकर यांचा या संमेलनात येण्यासाठी मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्र, देश - परदेशातून प्रतिसाद मिळत आहे. हे संमेलन यशस्वी करण्यासाठी मसापचे अध्यक्ष दगडू लोमटे, माजी अध्यक्ष व मार्गदर्शक अमर हबीब स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. बी.आय. खडकभावी व मसाप कार्यकारणी सदस्य व स्वागत समितीचे पदाधिकारी प्रयत्नशील आहेत. हे संमेलन रसिकाश्रयी असल्याने केवळ रसिकांकडून १०० रुपये स्वागत मूल्य घेऊन हे संमेलन दर दोन वर्षांनी भरवले जाते. यावर्षी हे दहावे अंबाजोगाई साहित्य संमेलन भटविले जात आहे. आपणही स्वागत मूल्य शंभर भरून स्वागत सदस्य व्हावे, असे आवाहन स्वागताध्यक्ष प्राचार्य बी.आय. खडकभावी व मसाप सचिव गोरख शेंद्रे यांनी व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# गंगापूर तहसील कार्यालयातील अभिलेख विभागाचा घोडेबाजार

## महसूल अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने नागरिकांची सर्रास लूट

आधुनिक केसरी न्यूज




**औरंगाबाद :** जिल्ह्यातील गंगापूर तहसील कार्यालय नेहमीच कुठल्या ना कुठल्या विषयांवरुन चर्चेत राहत असते आणि आता तर येथे हद्दच पार झाली आहे. कार्यालयातील महसूल विभागातील अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने येथील अभिलेख विभागात तर सामान्य नागरिकांची सर्रासपणे लूट सुरु आहे. ना कुठला कायद्याचा धाक ना कुठली भीती ठेवता सरळसरळ महसुल विभागाच्या नियमाला केराची टोपली दाखविण्याचे काम येथील कर्मचारी करतांना दिसत आहेत.

सविस्तर वृत्त असे की, ग्रामीण भागांतून रोज कुठल्या ना कुठल्या नकलेसाठी नागरिक येथे गर्दी करीत असतात. मात्र त्यांना नक्कल देणेसाठी याठिकाणी अव्वाची सव्वा रक्कम वसूल केली जाते आणि त्यापेक्षाही महत्वाचा भाग म्हणजे या नकलेच्या मोबदल्यात घेतल्या जाणाऱ्या रकमेची शासनाच्या तिजोरीत कुठलीही नोंद न करता त्यांना त्याची रीतसर पावती सुद्धा दिली जात नाही यामुळे कर्मचारी अगदी गब्बर होताना दिसत आहे तर महसुल अधिकारी कायद्याला ठेंगा दाखवत असून मीच मालक असल्यासारखे भाषवित आहे.

एका नकलेसाठी 200 ते 300 रुपये घेतले जातात तर आगाऊ 200 रुपये दिले म्हणजे तासांभरात नक्कल मिळते. अन्यथा एखाद्या नागरिकांकडे पैसे कमी असतील तर त्यांची नक्कल देणेसाठी त्यांना आठ दिवस चकरा माराव्या लागतात अशी भावनिक प्रतिक्रिया नाव न सांगण्याच्या अटींवर काही नागरिकांनी "दैनिक आधुनिक केसरी" सोबत बोलताना दिली आहे. तर शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारणाऱ्या व मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करणाऱ्या या गंभीर विषयाची बातमी घेण्यासाठी पत्रकार बांधव गेले असता महसूल अधिकारी आणि कर्मचारी यांनी पाळलेले भुरटेचोर पत्रकारांना दादागिरीची भाषा करतात कारण त्यांची दुकानदारी बंद पडण्याची मोठी भीती त्यांना असते. वरील घडणारा सर्वच प्रकार छुप्या कॅमेऱ्यात कैद झाला असून या भ्रष्टाचाराचा छडा लावल्याशिवाय आणि भ्रष्ट अधिकाऱ्याला घरी पाठविल्याशिवाय दैनिक आधुनिक केसरी सुद्धा आता शांत बसणार नाही.



**तहसील कार्यालयातील अभिलेख विभागात झालेल्या आणि घडत असलेल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणाची मी चौकशी करतो आणि असा प्रकार करुन सर्वसामान्य लोकांच्या खिशावर कात्री आणणाऱ्या आणि शासनाच्या तिजोरीची लूट करणाऱ्या कर्मचाऱ्यावर मी योग्य ती कारवाई करतो.**

**सतीश सोनी, तहसीलदार गंगापूर**

# घरावर ताबा मिळवण्यासाठी वृद्ध महिलेला जीवे मारण्याची धमकी

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** प्रशांत सुकलाल बडगुजर व दर्शना प्रशांत बडगुजर हे नाशिक येथून 2018 मध्ये सोनगीर येथे आले त्यांना राहण्यास घर नव्हते. म्हणून त्यांना एका वृद्ध महिलेने आपल्या घरात सहारा दिला. मात्र या दांपत्याची नियत फिरली. त्यांनी थेट घरावर ताबा बसवण्यासाठी या वृद्ध महिलेला जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे, असा गंभीर आरोप स्वतः वृद्ध महिलेने प्रसारमाध्यमांसमोर मांडला आहे तसेच न्याय हक्कासाठी जिल्हा प्रशासनाला निवेदन सादर केला आहे.

जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रशांत सुकलाल बडगुजर व दर्शना प्रशांत बडगुजर हे नाशिक 2018 मध्ये सोनगीर येथे आले त्यांना राहण्यास घर होते. त्यामुळे माझ्या घरात राहत या दोघांना सांगितले त्यांनी 15/ 6/2018 पासून तर आजपर्यंत घरभाडे दिले नाही. माझ्या चांगल्या वागणुकीचा फायदा घेत या दाम्पत्याने दादागिरी करत मला जिवे मारण्याची धमकी देऊन घरावर ताबा बसवला तसेच या पती-पत्नीकडून त्रासही देण्यात येतात. या लोकांपासून माझ्या जीवितास धोका असून माझा केव्हाही घातपात होऊ शकतो. त्यामुळे याची सखोल चौकशी करून या दांपत्याला तात्काळ माझ्या घरातून काढून त्यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी व मला न्याय द्यावा अशा आशयाचे निवेदन वृद्ध महिला बनाबाई जगन्नाथ बडगुजर यांनी जिल्हा प्रशासनाला निवेदनातून केले आहे.

# अनुनाद कलाविष्कार बहुउद्देशीय संस्थेतर्फे त्रिवेणी कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त अनुनाद कलाविष्कार बहुउद्देश्यीय संस्थेतर्फे नृत्य, नाट्य, निवेदनात्मक त्रिवेणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यसंग्रामात अनेक महिलांनी योगदान दिले आहे, त्यातच सावरकर घराण्यातील महिलांचाही समावेश आहे.

बाबाराव सावरकरांच्या पत्नी यशोदाबाई, विनायकराव सावरकराची पत्नी यमुनाबाई आणि नारायणराव सावरकरांच्या पत्नी शांताबाई यांचा अलौकिक असामान्य जीवन प्रवास, त्यांचा देशासाठीचा त्याग, समर्पण या कार्यक्रमातून मांडण्याचा प्रयास आम्ही केला आहे. आजच्या पिढीला, सामान्य व्यक्तींना या तिन्ही महिलांचे खडतर जगणे समजून देशप्रेमाची मशाल जनमाणसाच्या मनात प्रज्वलित व्हावी या हेतूने आम्ही कार्यक्रम आयोजित करत आहोत. अशा प्रकारचे कार्यक्रम ही समाजाची आवश्यकता आहे. केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तेव्हा बँक ऑफ महाराष्ट्र प्रायोजित त्रिवेणी हा कार्यक्रम जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी सर्वांसाठी मोफत असणाऱ्या या कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात आले आहे. येत्या २६ जूनला, सायंकाळी ५ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात हा कार्यक्रम होणार आहे. शहरातील जवळपास २५ कलाकार कार्यक्रमात सादरीकरण करणार असल्याचे अनुनाद कलाविष्कार बहुद्देशीय संस्था, औरंगाबादच्या सचिव राजश्री पोहेकर-कुलकर्णी यांनी सांगितले आहे.

होल्डिंग हॅन्ड्स
बहुउद्देशिय संस्था, औरंगाबाद
समाजाच्या हितासाठी एकमेकांचा हात धरून मानवी साखळी बनवूया.
संस्थेचे उद्देश
माणसे जोडणे | आरोग्य | शिक्षण | पर्यावरण | सांस्कृतिक
महिला लघु उद्योग आणि रोजगार | सामाजिक बांधिलकी असलेले सर्व उपक्रम

सुरेश सिरसीकर
संस्थापक/ अध्यक्ष

रविंद्र बनकर
उपाध्यक्ष

अपर्णा मेहता
सचिव
अधिक माहितीसाठी : 7020577693 | holdinghands092@gmail.com

# खेळाडूंची प्रात्यक्षिके व मशाल रॅली काढून ऑलिम्पिक दिन साजरा

## आंतरराष्ट्रीय खेळाडू व शालेय विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** २३ जून हा आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक दिन निमित्ताने औरंगाबाद शहरात ऑलिंपिकचा प्रसार आणि प्रचार व्हावा यासाठी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, विभागीय क्रीडा संकुल समिती व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

ऑलिम्पिक मशाल डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. प्रमोद येवले यांच्या हस्ते प्रज्वलित करुन डेफ ऑलिंपिक खेळाडू आदिती निलंगेकरकडे सोपविण्यात आली. याप्रसंगी महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे सदस्य डॉ. उदय डोंगरे, जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे, हॉकी महाराष्ट्राचे उपाध्यक्ष पंकज भारसाखळे, महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सचिव गोविंद शर्मा, महाराष्ट्र जिम्नैस्टिकचे संघटनेचे सचिव डॉ.मकरंद जोशी, क्रीड़ा-भारतीचे सचिव डॉ.संदीप जगताप, राज्य सॉफ्टबॉल संघटनेचे गोकुळ तांदळे यांच्यासह अनेक क्रीडा संघटक, क्रीडा शिक्षकांची उपस्थिती होती. डेफ ऑलम्पिक खेळाडू आदिती निलंगेकर कुलगुरू यांच्या हस्ते बॅग देऊन सत्कार करण्यात आला. रॅलीच्या प्रारंभी ऑलिंपिक ध्वजामध्ये असलेल्या लाल, हिरवा, निळा, पिवळा व काळा रंगाचे फुगे मान्यवरांच्या हस्ते हवेमध्ये सोडण्यात आले. विविध क्रीडा प्रकारांच्या खेळाडूंची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी श्री गजानन महाराज मंदिर चौकात विनायक राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली मल्लखांब चे



चित्तथरारक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. छाया मिरकर यांच्या मार्गदर्शनाखाली योगाचे प्रात्यक्षिक, महेश इंदापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली वूशू चे प्रात्यक्षिक, सागर मगरे यांच्या मार्गदर्शनाखाली तलवारबाजी खेळाचे प्रात्यक्षिक, सुरेश मिरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कराटे खेळाचे प्रात्यक्षिक, राहुल टाक यांच्या मार्गदर्शनाखाली बॉक्सिंग खेळाचे प्रात्यक्षिक युवा खेळाडूंनी सादर केले. त्याला प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली.

मशाल रॅलीमध्ये विविध खेळांच्या खेळाडूंसह ज्ञानप्रकाश विद्या मंदिर, धारेश्वर विद्यालय, आर.पी. नाथ हायस्कूल, कलावती चव्हाण हायस्कूल, शिवछत्रपती महाविद्यालय, रिव्हरडेल हायस्कूलच्या जवळपास 1100 विद्यार्थी खेळाडूंनी उस्फूर्तपणे सहभागी होत श्री गजानन महाराज मंदिर ते विभागीय क्रीडा संकुलपर्यंत मशाल रॅलीमध्ये सहभाग नोंदवला. मशाल रॅलीस कुलगुरू यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. रॅलीतील सहभागी खेळाडूंच्या हातामध्ये ऑलिंपिक खेळाडूंचे फोटो असलेले बोर्ड होते, त्याचप्रमाणे ऑलिम्पिकचा ध्वज व विविध रंगाचे ध्वज खेळाडूंनी हातामध्ये घेतले होते. त्याचप्रमाणे ऑलिंपिक खेळ, क्रीडा संस्कृती व देशभक्तिपर विविध घोषणांनी वातावरणामध्ये चैतन्य निर्माण झाले होते. चरणजीत संघा व भिकन अंबे यांच्या मार्गदर्शनाखाली सायकल रॅलीसही कुलगुरू यांच्या हस्ते ध्वज दाखवून प्रारंभ करण्यात आला.

कुलगुरू व इतर मान्यवरांनी खुल्या जीपमधून श्री गजानन महाराज मंदिर चौक ते विभागीय क्रीडा संकुल या पर्यंत खेळाडू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

रॅलीमध्ये सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या वतीने टोप्या व क्रीडा संघटक, क्रीडा शिक्षकांना ऑलिम्पिकचे टी-शर्ट देण्यात आले होते. रॅलीचे समन्वयक कैलास वाहुले, काळकर, रणजित पवार, सागर मगरे, विनायक राऊत, रोहित गाडेकर, पाटील, पोटे आदींचा मान्यवरांच्या हस्ते क्रीडा पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संदीप जगताप यांनी केले तर आभार अभय देशमुख यांनी मानले. ऑलिंपिक दिनाचे भव्य दिव्य व सुटसुटीत, व्यवस्थित नियोजन करण्यासाठी चंद्रशेखर घुगे, सुरेश मिरकर, डॉ. दिनेश वंजारे, तुषार आहेर, संतोष अवचार, विकास सूर्यवंशी, डॉ. पंढरीनाथ रोकडे, पुनम नवगिरे, श्रीनिवास मोतीयेळे, अनिल जाधव, आशुतोष मिश्रा, राहुल टाक, चव्हाण आदींनी पुढाकार घेतला.



# परिचय अनिमेशन स्टुडिओचा 'पानीलोक' भारतातील पहिला अंडरवॉटर अनिमेशन चित्रपट

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** निर्माते दिग्दर्शक अंकित डे, ईपी अनूप डे यांच्या या चित्रपटात प्रसिद्ध कलाकार सोनल कौशल आणि संजय केनी यांचा आवाज आहे. भारतीय चित्रपटसृष्टीत वेगवेगळे नवनवीन प्रयोग केले जात आहेत. भारतीय एनिमेशन उद्योगातील पहिला अंडरवॉटर एनिमेशनथीम असलेली फीचर फिल्म, "पानीलोक" येत आहे, जो एक नवीन दृष्टीकोन देतो. परिचय एनिमेशन स्टुडिओची निर्मिती असलेला हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे. मेट्रोपोलिस हॉटेल, मुंबई येथे चित्रपटाची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती ज्यात चित्रपटाचे निर्माते दिग्दर्शक अंकित डे, सहदिग्दर्शक दीपशिखा डेका, कार्यकारी निर्माते अनूप डे, व्हॉईस ओव्हर आर्टिस्ट सोनल कौशल आणि संजय केनी उपस्थित होते.

मानवी क्रियाकलापांमुळे होणाऱ्या गंभीर पर्यावरणीय परिणामांबद्दल बोलताना, हा चित्रपट एका लहान मुलाच्या शोधक मनाचे सौंदर्य देखील समोर आणतो कारण हे मूल साहसी आणि पाण्याच्या पलीकडे काय आहे याचा शोध घेते. पर्यावरण प्रदूषणासारख्या गंभीर विषयावर आधारित पाण्याखालील थीमवर आधारित फीचर फिल्म बनवण्याची ही पहिलीच वेळ आहे. हा चित्रपट हिंदी आणि इंग्रजी भाषेत असेल आणि 2023 मध्ये जगभरात प्रदर्शित होईल. चित्रपटाशी संबंधित बहुतेक लोक आसाममधील आहेत.

भारतीय एनिमेशनच्या उत्क्रांतीबद्दल बोलताना, एनिमेशन स्टुडिओचे प्रमुख आणि चित्रपटाचे दिग्दर्शक अंकित डे म्हणाले की, आज भारतीय दिग्दर्शक आणि एनिमेशन हाऊसेस जागतिक दर्जाचे चित्रपट तयार करण्यास सक्षम आहेत, पानीलोक बनवण्यामागील संकल्पना हे दाखवून देण्याची होती की ते आहे. जागतिक दर्जाचा एनिमेशन चित्रपट भारतातही बनवता येईल. ते पुढे म्हणाले, "गेल्या दशकात भारतीय एनिमेशन उद्योग खरोखरच खूप विकसित झाला आहे. जागतिक दर्जाच्या एनिमेशन स्टुडिओच्या तुलनेत आमचा प्रवास नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब आणि सर्जनशील मनाने काम केल्यामुळे शक्य झाला आहे." पानीलोक हा इतर भारतीय एनिमेशन चित्रपटांपेक्षा गुणवत्तेच्या बाबतीत खूपच सरस आहे. आम्हाला एक बेंचमार्क सेट करून या उद्योगात क्रांती आणायची आहे. चित्रपटाच्या सह-दिग्दर्शिका दीपशिखा डेका म्हणाल्या, "आम्ही हा चित्रपट निवडला कारण ही अशी गोष्ट आहे ज्यामुळे आमची आवड लगेचच निर्माण झाली. आमच्या लेखकांनी दिलेल्या कथेने मी प्रभावित झालो आहे कारण मला वाटले की जर आपल्याला आपल्या भारतीयांसाठी काहीतरी मोठे करायचे असेल तर ॲनिमेशन इंडस्ट्री म्हणजे आपल्यासाठी नवीन आणि उद्योगात क्रांती घडवून आणणारे कार्य पूर्ण करण्याचे आव्हान आपल्याला स्वतःला द्यावे लागेल.

दिग्दर्शक अंकित डे यांनी सांगितले की, चित्रपटाचे 40 टक्के काम पूर्ण झाले आहे. VFX चे प्रभारी भरत सचदेवा आहेत तर अविनाश यांनी आवाज आणि संगीत हाताळले आहे. या चित्रपटात 2 गाणी देखील आहेत.

सोनल कौशल म्हणाल्या की, "पानीलोक" हे शीर्षकच सूचित करते की हा पाण्याखालील जगाचे चित्रण करणारा चित्रपट आहे. मी यात अनेक पात्रांना आवाज दिला आहे आणि डबिंग करताना मी स्वतः खूप एन्जॉय करत होतो, त्यामुळे मला खात्री आहे की हा चित्रपट लहान मुलांबरोबरच मोठ्यांचेही मनोरंजन करेल. मी इमोशनल होतो, असे अनेक सीन्स आहेत, त्यामुळे कॉमेडी, ड्रामा, इमोशन हे सर्व काही या चित्रपटात आहे. संजय केनी म्हणाले की, मी अनेक एनिमेशनमालिका केल्या आहेत पण यावेळी मला काहीतरी वेगळे करण्याची संधी मिळाली आहे. पानीलोकातील मानवी पात्रांना मी आवाज दिला आहे. नितीन शर्मा यांच्या सहकार्याने मी या चित्रपटाची कथा लिहिली असल्याचे लेखक जैन गुप्ता यांनी सांगितले. एनिमेशन चित्रपटाची स्क्रिप्ट लिहिणे खूप अवघड असते पण आम्ही ते अतिशय मनोरंजक पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

सोनल कौशलने माशाच्या सुंदर आवाजात काही संवाद बोलून सर्वांची मने जिंकली, तर संजय केणीने मुन्ना आणि सर्किटच्या आवाजात संवाद बोलून सर्वांची मने जिंकली. पानीलोकच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन व अभिनंदन करणारे पाहुणे म्हणून दलजित कौरही येथे उपस्थित होत्या. "पानीलोक" या चित्रपटाचे प्रमोशन अमर आणि रमाकांत मुंडे (मुंडे मीडिया पीआर) यांनी या पत्रकार परिषदेच्या पीआरची जबाबदारी स्वीकारली.



**धुळे :** शोएब नवाब बेग मिर्झा यांच्या प्रयत्नाने यांच्याकडून प्रभाग क्रमांक 12 मधील मुस्लिम नगर भागातील महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक 53/54 मध्ये आ. फारूक शाह यांच्या हस्ते रिबीन कापून आधार केंद्र सुरू करण्यात आले आहे. यासाठी खूप दिवसापासून हा विषय आ. फारुख शाह यांच्याकडे केला होता. यावेळी शोएब नवाब बेग मिर्झा यांच्या हस्ते आ. फारुख शाह यांच्या स्मरणार्थ शाल, टोपी व पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला.

# सावळदबारा परिसरात पाऊस; शेतकरी आनंदाला

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरात पाऊस बरसल्याने शेतकरी आनंदी झाला असून, तालुक्यात यंदाचा खरीप हंगामात जूनचा अर्धा महिना उलटला तरी पावसाअभावी पेरण्या खोळंबल्या होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली होती. परंतु परिसरात झालेल्या पावसाने शेतकरी राजा आनंदी झाला आहे.

शेतकऱ्यांनी जूनच्या सुरुवातीस ठिबक सिंचनावर कापूस लागवड केली होती; मात्र जूनचा अर्धा महिना उलटला तरी पावसाने हुलकावणी दिल्याने विहिरीचे, बोअरचे, शेततळ्याचे पाणी आटू लागल्याने उगवलेली पिके करपू लागली होती. सोयगाव तालुक्यात मागील आठवडयात कळविण्यात आले. जोरदार पाऊस झाला. त्यामुळे सिंचनावरील धूळ पेरणी केलेली पिके तरली. याच पावसाच्या जोरावर कापूस, मका, उडीद, मूग व इतर कडधान्याची पेरणी करण्यास सुरुवात झाली आहे. पावसाने जेव्हा ओलावा निर्माण झाला होता. त्यावर बियाणे रुजून लागवड झाली होती. त्यानंतर पावसाने उघडजाप दिल्याने याचा फटका उगवलेल्या अंकुरांना बसत होता. त्यामुळे शेतकऱ्यांवर पश्चात्तापाची व दुबार पेरणीची वेळ आली होती. परवा ४ वाजता विजेच्या कडकडाटासह पावसाचे आगमन झाल्याने पेरलेल्या व करपलेल्या पिकांना जीवदान मिळाल्याने शेतकरी आनंदी झाले आहेत. दरम्यान, सोयगाव तालुक्यात ४२ हजार ३९२ हेक्टरवर पेरणीचे नियोजन आहे. त्यापैकी आतापर्यंत ५० टक्के क्षेत्रात पेरणी झाल्याचा अहवाल सोयगाव कृषी विभागातर्फे कळविण्यात आले आहे.



काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# छाया कोरेगावकर यांच्या 'रिक्त-विरक्त' या कादंबरीचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** 'ग्रंथाली' प्रकाशित सुप्रसिद्ध कवयित्री छाया कोरेगावकर यांच्या 'रिक्त-विरक्त' या कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले. साहित्य जगतात कादंबरी हा विषय सध्या मागे पडलेला असताना या कादंबरीचे आगमन हा कौतुक व चर्चेचा विषय ठरला आहे. प्रख्यात कवयित्री प्रज्ञा पवार यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईच्या दादर- माटुंगा कल्चरल सेंटर येथे हा नेटका समारंभ पार पडला. सुप्रसिद्ध लेखक व अक्षर मानव चे सर्वेसर्वा राजन खान, मुंबई विद्यापीठातील मराठीच्या प्राध्यापिका आणि लेखिका डॉ.श्यामल गरुड तसेच विद्रोही कवी प्रकाश नाईक कोल्हापूर हे मान्यवर वक्ते म्हणून उपस्थित होते.

राजन खान यांनी या कादंबरीच्या स्त्रीवादी पैलूंवर प्रकाश टाकला. प्रत्येक पुरुषाला आपल्या चुकांचा शोध घ्यायला लावणारी ही कादंबरी असल्याचे नमूद करून, त्यांनी या कादंबरीमध्ये वेबसिरीज किंवा चित्रपट बनवण्यासारखे सशक्त कथाबीज असल्याचे सांगितले. प्रा.प्रकाश नाईक यांनी विस्तृतपणे यातील शक्तीस्थळांची ओळख करून दिली. स्त्री आणि पुरुष यांच्यातील लैंगिक संबंधांच्या पलीकडे जाऊन निखळ प्रेमाचा स्वीकार, हे कादंबरीचे सूत्र त्यांनी अधोरेखित केले. डॉ.श्यामल गरुड यांनी या कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या सामाजिक आशयावर भर देत, भारतातील पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेमुळे स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या दुःखाची मांडणी केली. या कादंबरीची नायिका सावित्री हिची जी जीवघेणी फरफट झाली. त्याच्या मुळाशी असलेले जातवास्तव यावरही त्यांनी विस्तृतपणे प्रकाश टाकला. डॉ.प्रज्ञा दया पवार यांनी अध्यक्षीय भाषणातून यातील अनेक पेच-गुंतागुंत-व्यक्तिरेखा उलगडून दाखवल्या. स्त्रीला स्वतःच्या लैंगिक जाणिवा व्यक्त करायला इथली समाजव्यवस्था परवानगी देत नाही. स्त्रियांच्या लेखनावरही बंधने घातली जातात हे वास्तव मांडून, छाया कोरेगावकर यांची ही कादंबरी रसरशीत जीवनाचे कसे दर्शन देते यावर उत्कट भाष्य केले. मराठी कादंबरीच्या प्रवासातील ही एक सशक्त कादंबरी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

लेखिका छाया कोरेगावकर यांनी आपल्या मनोगतातून, यात आलेल्या सगळ्या व्यक्तिरेखा या काल्पनिक नसून त्या आपल्याला जीवनाच्या प्रवासात भेटल्या असल्याचे नमूद केले. यातील अनेकांनी आपल्याला त्रास दिला पण आपण त्यांना माफ केले. त्यांच्यामुळे ही साहित्यकृती लिहू शकलो त्यामुळे त्यांचे मी आभारच मानते, असे त्यांनी प्रांजळपणे कबूल केले. साध्या-सोप्या भाषेतील त्यांचे मनोगत वाचकांना खूप भावले.

प्रा.वृषाली विनायक यांच्या सुंदर-नेटक्या सुत्रसंचालनाने या कार्यक्रमाचे देखणेपण वाढले. ग्रंथाली प्रकाशनचे सुदेश हिंगलासपूरकर हेही मंचावर उपस्थित होते. स्त्रीचे माणूसपण अधोरेखित करणाऱ्या, लेखिकेच्या या पहिल्या-वहिल्या कादंबरीच्या कार्यक्रमाला साहित्य व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर आवर्जुन हजर होते.

# पंचशीलाचे आचरण हाच जगाच्या कल्याणाचा एकमेव मार्ग : भंते डॉ. ज्ञानश्री महाथेरो

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** तथागत गौतम बुद्धांनी सांगितलेले पंचशील शांतीच्या मार्गाने नेते, पंचशीलाच्या आचरणामुळे व्यक्ती, समाज आणि देशात वैरभाव आणि कपटभावना संपुष्टात येते, असे झाले तर कुणीच कुणाचा राग, द्वेष करणार नाही आणि पोलिस, संरक्षण खात्यावर होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च टाळून तो अन्य कल्याणकारी योजनांवर खर्च करता येईल. पंचशीलाचे आचरण हाच जगाच्या कल्याणाचा एकमेव मार्ग आहे, असे बांगलादेशचे भंते डॉ. ज्ञानश्री महाथेरो यांनी म्हटले आहे.

पूज्य भदंत अर्हत साधनानंद महाथेरो (बना भंते) यांचे सीमागुरू असलेले बांगलादेशचे १३ वे संघराजा डॉ. ज्ञानश्री महाथेरो हे सध्या भारत भेटीवर आले आहेत. ते ७८ वर्षांपासून भिक्खू जीवन जगत आहेत. मुंबईत आगमन झाल्यानंतर सध्या ते औरंगाबाद मुक्कामी आहेत. त्यानिमित्त सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक येरेकार यांच्या निवासस्थानी डॉ. ज्ञानश्री महाथेरो यांच्यासह भिक्खू संघाला चिवरदान व अन्नदान करण्यात आले. त्यानंतर डॉ. ज्ञानश्री महाथेरो यांची धम्मदेसना झाली. डॉ. ज्ञानश्री महाथेरो यांनी बंगाली भाषेतून धम्मदेसना दिली. या धम्मदेसनेचा हिंदीतून अनुवाद भंते बोधीमित्र थेरो यांनी केला. यावेळी भंते ग्यानरक्षित थेरो, भंते के.बी. नंदपाल थेरो, भंते देवरत्न थेरो, भंते संघप्रिय थेरो यांची उपस्थिती होती.

धम्मदेसनेत उपदेश करताना डॉ. ज्ञानश्री महाथेरो यांनी बौद्ध धम्मातील त्याग परिमिता, दान परिमिताचे महत्व विषद केले. पंचशील शांतीच्या मार्गाने जायला शिकवते. वैरभाव, कपटभावना नाहिसा करते. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे एक पुस्तक मी वाचले आहे. त्यात त्यांनीही पंचशीलाच्या आचरणाचे महत्व सांगितले आहे. पंचशीलाचे आचरण झाले असते तर लष्करी तुकड्या, पोलिस दले स्थापन करण्याची गरजच भासली नसती. लष्कर आणि पोलिसांवर होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च टळून तोच खर्च अन्य कल्याणकारी योजनांवर करता आला असता आणि त्यातून मानव जातीचे कल्याण साधता आले असते. परंतु पंचशीलाचे आचरणच झाले नसल्यामुळे या बाबींवर खर्च करण्याची वेळ आली आहे, असे भंते डॉ. ज्ञानश्री महाथेरो म्हणाले.

आपण नुसतेच पंचशील म्हणतो. परंतु ते आचरणात आणत नाही. केवळ पंचशील म्हणणे महत्वाचे नाही तर ते आचरणातही आणले पाहिजे. धम्माच्या प्राप्तीसाठी त्यागभावना महत्वाची आहे. बुद्धाने असीम त्याग केला. त्या त्यागातूनच त्यांना ज्ञानप्राप्ती झाली. भिक्षा मागून धम्माचा प्रचार केला. सर्वांचे मंगल होण्यासाठी त्यागभावना महत्वाची आहे. आपण यथाशक्ती त्यागभावना जोपासली पाहिजे. तुम्ही दररोज जो भात शिजवता त्यातील एक मूठ तांदूळ काढून बाजूला ठेवा. दररोज बाजूला काढून ठेवलेले मूठभर तांदूळ महिन्याकाठी विकून गरजूंना मदत करा. तुमच्या दररोजच्या कमाईतून एक रुपया बाजूला काढून ठेवा. या जमा झालेला एक एक रुपया जिथे शाळा, विहार नसतील, तेथे शाळा, विहार उभारणीसाठी दान करा. दान यासाठी दिले पाहिजे की, दान देण्यातून त्याग भावना येते. ही त्यागभावनाच धम्माच्या मार्गाने जाण्यास सहाय्यभूत ठरते, असेही डॉ. ज्ञानश्री महाथेरो म्हणाले. आपण जन्माला आलो, तेव्हा सोबत काहीही घेऊन आलेलो नाही. नग्नावस्थेत आपला जन्म झाला. परंतु जन्माला येताना आपण बोलणे, ऐकणे, पाहणे, विचार करणे असे गुण घेऊन आलो आहोत. जन्माला आलेले प्रत्येक शरीर एक दिवस मरणार आहेच. या शरीराने हिंसा, चोरी आणि व्याभिचार करू नका. तुम्ही तुमच्या स्वतःच्या मुलावर ज्या भावनेतून प्रेम करता त्याच भावनेतून अन्य मानव-प्राण्यांवरही प्रेम करा. कुणाचाही रागद्वेष करू नका. वाईट मार्गाने पैसा कमवू नका. कुशल कार्य करा. कुशल कार्य केल्याने तुम्ही दुर्गतीला जाणार नाही. तुमच्या मनात कपट भावना निर्माण होणार नाही. त्यामुळे कुणीच कुणाचा वैरी राहणार नाही. मग चोऱ्या, हत्या, हिंसाही होणार नाहीत आणि कोर्टकचेऱ्यांची गरजही संपुष्टात येईल, असेही भंदे डॉ. ज्ञानश्री महाथेरो म्हणाले.

यावेळी इंजि. बी. के. आदमाने, इंजि. बाबुराव म्हस्के, इंजि. भारत कानिंदे, वनिता सातदिवे, वसंत सातदिवे, इंजि. रमेश शिंदे, बाबुराव कदम, प्रकाश गायकवाड, ॲड. जयश्री भगत, जितेंद्र भवरे यांच्यासह उपासक- उपासिकांची उपस्थिती होती.

शनिवारी स्वागत सत्कार व पूजा वंदना

भंते डॉ. ज्ञानश्री महाथेरो यांची जाहीर धम्मदेसना, स्वागत सत्कार आणि पूजा वंदनेचा कार्यक्रम शनिवारी २५ जून रोजी दुपारी ४ ते ६ यावेळेत भानुदास चव्हाण सभागृह, इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स येथे आयोजित करण्यात आला आहे. औरंगाबादेतील उपासक उपासकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धम्मदेसनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन भिक्खू ग्यानरक्षित थेरो यांनी केले आहे.



# सोयगाव तालुक्यात कोरोनाबाबत जनतेसह शासकीय अधिकारीही बेफिकीर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा, फर्दापूर परिसरात सध्या सार्वजनिक ठिकाणी मास्क वापराबाबत गांभीर्य नसल्याचे दिसून येत आहे. जनतेने काटेकोरपणे काळजी घेण्याचे आवाहन सावळदबारा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. व्हि.पी.राजपूत यांनी केले आहे.

राज्यात कोरोना रुग्ण वाढत असले, तरी अजून जनतेवर निर्बंध घातलेले नाहीत. नागरिकांचे दैनंदिन जनजीवन, बाजारपेठा पूर्ववत सुरू आहेत. मात्र, देश कोरोनाच्या चौथ्या लाटेच्या उंबरठ्यावर असल्याचा मागम सही ग्रामीण जनतेच्या चेहऱ्यावर दिसत नाही. केवळ सोशल मीडियावर तात्पुरती चिंता व्यक्त केली जात आहे. नागरिक जणू काही कोरोना हद्दपारच झाल्याच्या अविर्भावात सार्वजनिक ठिकाणी वावरत आहेत. आज घडीला रुग्ण दररोज वाढत आहे. असे असताना नागरिक मात्र बिनधास्त असल्याचे दिसून येत आहेत.



विशेष म्हणजे बाजारपेठ व शासकीय नोकरदारही कोरोनाचे नियम पाळत नाहीत. कोरोनाच्या विशेषतः दुसऱ्या लाटेत गावोगावी अनेक कुटुंबांतील करत्या माणसांचे मृत्यू झाले.

चिंताजनक बाब असतानाही नागरिक चौथ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर नियमांकडे काणाडोळा करीत आहेत. नागरिकांनी घराबाहेर मास्क, सॅनिटायझरचा वापर करावा, सोशल डिस्टन्सिंगचे पालन करायला हवे आणि एकच नारा ठेवायला पाहिजेत. "आता देऊया एकच नारा बूस्टर लस घेऊन चौथी लाटेपासून कोरोना मुक्त करुयात देश राज्य शहर व गाव सारा" असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास राजपूत सावळदबारा यांनी केले आहे.

# शेतकरी पीककर्जासाठी झिजवताहेत उंबरठे

आधुनिक केसरी न्यूज

**बहादुर चव्हाण**

**देव्हारी :** सोयगाव तालुक्यात काही राष्ट्रीयीकृत बँकांच्या ग्राहकांना विविध प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या बँकांमध्ये पैसे भरणे व काढणे याव्यतिरिक्त दुसरे कोणत्याही प्रकारचे काम होत नसल्याने शेतकऱ्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सध्या शेतीची कामे, रासायनिक खते, बियाणे व इतर कामासाठी पैशांची नितांत गरज भासते. मात्र, संबंधित राष्ट्रीयीकृत बँकांकडून सारख्या अनेक गावांतील शेतकऱ्यांना पीककर्ज नियमित भरूनही नवीन कर्ज वेळेवर मिळत नाही. बँकेत आल्यावर कर्मचारी नाही, आम्ही दोनच कर्मचारी आहोत, कॅश काउंटर सांभाळावे की कर्जप्रकरणे बघावीत, अशी उत्तरे दिली जातात.

**शेतकऱ्यांपुढे प्रश्न**

गरीब शेतकऱ्यानी पेरणी कशी करावी हा प्रश्न पडला आहे, कोरोनामुळे सर्व आर्थिक आवक बंद असल्याने सोने तारणसुद्धा सध्या होऊ शकत नाही. त्यामुळे सर्वांत जास्त त्रास शेतकऱ्यांनाच होत आहे. मागील हंगामाचे घेतलेले पीककर्ज भरून हातचा पैसाही निघून गेला व नवीन पीककर्जही मिळेना. शेती कशी तयार करावी, असा प्रश्न पडला.

**बँकेत कर्मचारीही कमीच**

संबंधित बँकेत प्रत्यक्षात दोनच कर्मचारी असून, एक पद रिक्त, तर दोन कर्मचारी रजेवर असल्याची माहिती मिळाली. होणाऱ्या अडचणीबाबत शाखा व्यवस्थापकांना विचारणा केली असता या शाखेतील एकूण सात कर्मचाऱ्यांपैकी फक्त तीनच कर्मचारी काम करत असल्याने काही प्रमाणात तर अडचणी येणारच आहेत.

शक्य तेवढ्या ग्राहकांना सुविधा देत आहोत, असे सांगण्यात आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन जेथे कमी असलेल्या ठिकाणी कर्मचारी द्यावेत व होणाऱ्या अडचणी दूर कराव्यात, अशी मागणी होत आहे.

DON'T NEGLECT YOUR HEALTH
HEALTH IS WEALTH
A TRUSTED SUPAR MARKET IN CITY

MAHAVIR
GHAR SANSAR
● Wholesale & Retail ● Kirana, Dry Fruits, Spices
● Crockery, Home Appliances ● Home Cleaning Material, Steel & Aluminium
● Plastic Items & Many More
Sumit 7620111118 | Rajesh Jain 758834738
Ramesh Jain (Crockery) 9860481142 7620111117
Whatsapp Order & Any Order 9850017181
Delivery Status 9021395308 9657398232
Wholesale Enquiry 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.p. Road, Chelipura, Shahgunj, Aurangabad
Plot No. A25, Opp MIDC Police Station MIDC Chikalthana, Aurangabad